दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३१२ I बुधवार २६ ऑगस्ट २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' रुपाली चाकणकर–दिपाली सय्यद आमनेसामने



**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर अभिनेत्री तथा शिंदेसेनेच्या नेत्या दिपाली सय्यद यांनी पत्रकार परिषद घेत चाकणकर यांना प्रत्युत्तर दिले. 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटातील कोणतेही पात्र चाकणकर यांच्यावर आधारित असल्याचे आपण कुठेही म्हटलेले नाही, असा दावा सय्यद यांनी केला.चित्रपट प्रदर्शित होऊ नये यासाठी रुपाली चाकणकर ओटीटी प्लॅटफॉर्मच्या संबंधितांवर दबाव टाकत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, काहीही झाले तरी चित्रपट प्रदर्शित होणार असल्याचे सय्यद यांनी स्पष्ट केले.चाकणकर यांनी माझ्यावर बदनामीचा २५ कोटी रुपयांचा दावा दाखल केला आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून आपण चाकणकर यांना नोटीस पाठवून ५०० कोटी रुपयांचा बदनामीचा दावा केला असल्याचे सय्यद यांनी सांगितले.

# धर्मरक्षणाच्या नावाखाली अराजकता नको

## संघटित गुन्हेगारी मोडून काढा : महंत रामगिरी महाराजांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

### सराला बेटासाठी १६३ कोटींच्या विकास आराखड्याचीही मागणी





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वाकडी / श्रीरामपूर :** धर्मरक्षणाच्या नावाखाली अराजकता पसरवून समाजाला त्रास देणाऱ्या प्रवृत्तींचे वारकरी संप्रदाय कधीही समर्थन करणार नाही. श्रीरामपूरमधील संघटित गुन्हेगारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कठोरपणे मोडून काढावी. अशा प्रवृत्तीविरोधात गरज पडल्यास वारकरी संप्रदाय सर्वांत पुढे राहील, अशी स्पष्ट भूमिका महंत रामगिरी महाराज यांनी १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या उपस्थितीत त्यांनी ही मागणी केली. दरम्यान, सराला बेटाच्या विकासासाठी सुमारे १६३ कोटी रुपयांचा निधी, तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सराला बेट येथे गोदावरीकाठी तातडीने घाट उभारण्याची मागणीही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

धनगरवाडी येथे योगीराज सद्गुरू श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार रमेश बोरनारे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार अमोल खताळ, आ. विवेक कोल्हे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, नितीन दिनकर, बाबासाहेब चिडे, प्रकाश चित्ते, निरज मुरकुटे, बबन मुठे, सिद्धार्थ मुरकुटे, भैरव कांगुणे, डॉ. विजय कोते, गणेश कारखान्याचे चेअरमन सुधीर लहारे, शिवसेनेचे कमलाकर कोते, नानासाहेब शिंदे, सर्जेराव मुंडे, संजय ढोकचौळे, राधाकृष्ण बोरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि लाखो भाविक उपस्थित होते.

सात दिवस चाललेल्या या सप्ताहात अखंड हरिनाम, पहाटेची काकड आरती, भगवद्गीता व संतसाहित्यावरील प्रबोधन, हरिपाठ आणि कीर्तनामुळे धनगरवाडी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. आठ ते दहा हजार टाळकरी एकाच तालात तब्बल १६८ तास हरिनामाचा गजर करीत असल्याचे सांगण्यात आले. या परंपरेला आता १७९ वर्षे पूर्ण झाली असून, सप्ताहाने द्विशताब्दीकडे वाटचाल सुरू केली आहे.

सांगता सोहळ्यातील आपल्या कीर्तनाच्या प्रारंभी महंत रामगिरी महाराज यांनी श्रीरामपूरमधील संघटित गुन्हेगारीच्या प्रश्नाला थेट हात घातला. धर्मरक्षणाच्या नावाखाली पुढे येणाऱ्या व्यक्ती किंवा प्रवृत्तींकडून अराजकता निर्माण होत असेल आणि त्याचा समाजाला त्रास होत असेल, तर ते मान्य करता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी हभप. हरीशरण महाराज, संदिपान महाराज, नवनाथ महाराज आंधळे, उत्तम महाराज गाडे, बाळासाहेब महाराज रंजाळे, बहिरट महाराज, दत्तात्रय खपके, मधुकर महाराज उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीरामपूरमधील संघटित गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. वारकरी संप्रदाय गुंडगिरीचे कधीही समर्थन करणार नाही. अशा प्रवृत्तींविरोधात समाजाच्या हितासाठी आपण ठामपणे उभे राहू, असेही त्यांनी सांगितले.

कुंभमेळ्याच्या काळात लाखो भाविक गोदावरी स्नानासाठी सराला बेट येथे येतात. (पान ४ वर)

### राधा – कृष्ण, राधा –कृष्ण...

#### मुख्यमंत्री फडणवीस आणि थोरात यांची फुगडी रंगली...



संत गंगागिरी महाराज सप्ताहात राजकारण, जात पात भेदाभेद सर्व विसरून बेटाचे भक्त म्हणून लाखो भाविकासह सर्वपक्षीय नेतेमंडळी एका व्यासपीठावर एकत्र येतात. सप्ताह परंपरेनुसार आज टाळ मृदंगाच्या गजरात राधा – कृष्ण ठेक्यावर फुगडी सोहळ्याची चांगलीच रंगत वाढली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस – वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांच्या प्रथम फुगडीने सुरूवात झाली. नंतर मुख्यमंत्री – आ.विवेक कोल्हे, मुख्यमंत्री – आ.आशुतोष काळे, मुख्यमंत्री – रामगिरी महाराज, उपमुख्यमंत्री शिंदे– महाराज, ना. विखे पाटील – महाराज, मुख्यमंत्री – ना.विखे पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस –कॉग्रेसचे माजी महसूलमंत्री मंत्री बाळासाहेब थोरात या फुगडीस लाखो भाविकांकडून टाळयांचा कडकडाट पहावयास मिळाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, बाळासाहेब थोरात, महंत रामगिरी महाराज या चौघांच्या अखेरच्या रिंगण फुगडीसही भाविकांना जोरदार प्रतिसाद दिला.

### विखे–पाटलांची राज्यमान्यतेची मागणी

सद्गुरू गंगागिरीजी महाराजांचा अखंड हरिनाम सप्ताह आता केवळ धार्मिक कार्यक्रम राहिलेला नसून लोकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे त्याला लोकोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आषाढी–कार्तिकी वारीप्रमाणे या सप्ताहालाही राज्य सरकारने अधिकृत 'राज्यमान्यता' द्यावी, अशी मागणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे–पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.

### 'विठ्ठलाच्या भक्तीपुढे कुठलाही जागतिक विक्रम खुजा'

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनगरवाडीतील भक्तीचा महासागर पाहून समाधान व्यक्त केले. १७९ वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा आणि आठ ते दहा हजार टाळकऱ्यांकडून १६८ तास होणारा अखंड हरिनामाचा गजर हा अलौकिक सोहळा असल्याचे त्यांनी सांगितले. सप्ताहाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली असली, तरी विठ्ठलाच्या भक्तीपुढे कुठलाही जागतिक विक्रम खुजा आहे, असे शिंदे म्हणाले.

### शेतकरी आणि वारकरी महाराष्ट्राची खरी ताकद

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महंत रामगिरी महाराज यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. शेतकरी आणि वारकरी हे महाराष्ट्राची खरी ताकद असल्याचे सांगत त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. सराला बेटाच्या विकासाबाबत तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी आवश्यक सुविधांबाबत शासन सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### वंदे मातरम् सामूहिक गायनाचा विश्वविक्रम

अखंड हरिनाम सप्ताहाच्या धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणाबरोबरच राष्ट्रभक्तीचा संदेश देणाऱ्या 'वंदे मातरम्' सामूहिक गायनाच्या जागतिक विक्रमाचीही यावेळी चर्चा झाली. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी राष्ट्रभक्तीच्या भावनेतून 'वंदे मातरम्'चा जयघोष केला. आध्यात्मिक परंपरा, वारकरी संस्कृती आणि राष्ट्रभक्ती यांचा संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला. भक्तीबरोबरच देशभक्तीची भावना जागविणाऱ्या अशा उपक्रमांमुळे सप्ताहाचे सामाजिक आणि राष्ट्रीय महत्त्व अधिक अधोरेखित होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

## तुकाराम मुंढेंचा दणका..

### ३७ हॉटेल, अन्न आस्थापनांवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेंतर्गत ३७ हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे आणि अन्य अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यापैकी ३१ आस्थापनांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या असून, चार आस्थापनांचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहेत. कारवाई दरम्यान सुमारे २ कोटी २५ लाख रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला.



नागपूरमध्ये तब्बल ५५ हजार ९९६ किलो भाजलेल्या सुपारीचा साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत सुमारे २ कोटी २३ लाख ९८ हजार ४०० रुपये असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली.

मुंबईतील फोर्ट येथील आयुब्स या आस्थापनाची २२ ऑगस्ट रोजी तपासणी करण्यात आली. यावेळी अन्नपदार्थांसाठी आवश्यक तापमान नियंत्रणाचा अभाव, नाशवंत पदार्थांची अयोग्य साठवणूक, कच्चे व शिजवलेले पदार्थ एकत्र ठेवणे, अस्वच्छ परिसर, उघडी गटारे, साचलेले पाणी आणि घरमाशांची उपस्थिती आढळली. तसेच कीटक नियंत्रण, कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वच्छता आणि अन्नपदार्थांच्या ट्रेसिबिलिटी नोंदींमध्येही त्रुटी आढळल्या. त्यामुळे या आस्थापनाचा ऋडअख परवाना २३ ऑगस्टपासून निलंबित करण्यात आला.

कुर्ल्यातील मेसर्स संकल्प महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित तसेच नागपूरमधील (पान ४ वर)

## जमीन दाखवण्याच्या बहाण्याने श्रीरामपूरच्या दोघांना जामखेडमध्ये लुटले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** वडील आजारी असून उपचारासाठी पैशांची गरज असल्याचे सांगत जमीन विक्रीच्या बहाण्याने श्रीरामपूर येथील दोघांना जामखेड तालुक्यात बोलावून त्यांच्यावर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तब्बल ३ लाख ६४ हजार रुपयांचा ऐवज लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी एका महिलेसह तिच्या तीन साथीदारांविरुद्ध जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महिलेसह चौघांवर गुन्हा**

कलिम अवद बिनसाद (वय ४३, रा. शैलाणी बाबा दर्ग्याजवळ, वॉर्ड क्रमांक ३, श्रीरामपूर) हे बॅग शॉपी तसेच सिक्युरिटी फोर्स चालवितात. त्यांच्या सिक्युरिटी फोर्समध्ये काम करणाऱ्या हिना शबीर शिंदे (रा. पाटोदा, जि. बीड) हिची त्यांच्याशी ओळख होती. १९ ऑगस्ट रोजी हिना हिने बिनसाद यांचे सहकारी ज्ञानेश्वर महादेव घायतडक यांना फोन करून वडील आजारी असल्याने उपचारासाठी जमीन विकायची असल्याचे सांगितले. जमीन पाहण्यासाठी येताना इसाराची रक्कम घेऊन येण्यासही तिने सांगितले.

त्यानुसार २३ ऑगस्ट रोजी बिनसाद व घायतडक हे आय-२० कारने जामखेड येथे आले. हिना हिने त्यांना खर्डा रोड परिसरातील लोकेशन पाठवून बोलावून घेतले. तेथे तिच्यासोबत असलेल्या एका व्यक्तीने मोटारसायकलच्या मागे येण्यास सांगितले. त्यानुसार दोघे नान्नज, चोभेवाडीमार्गे बऱ्हाणपूर परिसरात पोहोचले.दुपारी सुमारास (पान ४ वर)

## जेधे–बेग टोळीच्या संघटित गुन्हेगारीवर पोलिसांचा प्रहार!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** आर्थिक फायद्यासाठी संघटित टोळी तयार करून खुनाचा प्रयत्न, अपहरण, दरोडा, प्राणघातक हल्ले आणि शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे करणाऱ्या कुख्यात जेधे–बेग टोळीवर श्रीरामपूर पोलिसांनी मोठा बडगा उगारला आहे. मोक्का कायद्याच्या धर्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १११ (संघटित गुन्हेगारी) वाढीव कलम लावून पोलिसांनी कारवाई केली आहे. या कलमानुसार दोष सिद्ध झाल्यास जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे.




**बीएनएस कलम १११ अन्वये कारवाई; गोरख जेधे, सोन्या बेगसह चौघांचा समावेश**

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी श्रीरामपूर शहरातील हुसेननगर येथील आयुब पठाण यांचा मुलगा शाहरुख याला दोन अनोळखी व्यक्तींनी भंगार घेण्याच्या बहाण्याने इंदिरानगर परिसरातील कृष्णविहार प्लॉटिंग येथे नेले. तेथे कुख्यात गोरख जेधे व त्याच्या साथीदारांनी शाहरुखवर चापराने वार करून तसेच पिस्तुलातून गोळी झाडून त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पोलिस उपनिरीक्षक रोशन निकम तपास करीत आहेत.तपासादरम्यान सदर टोळी सराईत असून, तिच्या सदस्यांविरुद्ध श्रीरामपूर शहर, संगमनेर, नाशिक रोडसह विविध पोलिस ठाण्यांत खुनाचा प्रयत्न, दरोडा, अपहरण, शस्त्रास्त्र कायदा आणि मारहाणीचे अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.गोरख उर्फ विजय मुन्ना जेधे (रा. डावखर रोड, श्रीरामपूर) याच्यावर १२ गंभीर गुन्हे, जयप्रकाश उर्फ सोन्या अशोक बेग (रा. सरस्वती कॉलनी) याच्यावर १५, अंकुश रमेश जेधे (रा. डावखर रोड) याच्यावर ६, तर मनोज संजय साबळे (रा. श्रीरामपूर) याच्यावर १० गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. या गुन्ह्यात दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांचाही समावेश असल्याचे तपासात समोर आले आहे. गुन्हे दाखल असतानाही या टोळीतील आरोपींनी बेकायदेशीर कृत्ये सुरूच ठेवून आर्थिक फायद्यासाठी परिसरात दहशत निर्माण केल्याचा पोलिसांचा आरोप आहे. त्यामुळे श्रीरामपूर शहर पोलिस (पान ४ वर)

## १० लाख टन साखर आयातीचा निर्णय

### साखर साठवणुकीवरही निर्बंध; विक्रेत्यांना ४ हजार क्विंटलची कमाल मर्यादा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** साखरेच्या दराने अचानक उसळी घेतल्याने ग्राहकांच्या खिशाला मोठा फटका बसत असतानाच केंद्र सरकारने दरवाढीला लगाम घालण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. देशात १० लाख टन साखर आयात करण्यास परवानगी देण्यात आली असून, दुसरीकडे साखरेच्या साठेबाजीला आळा घालण्यासाठी विक्रेत्यांवर साठा मर्यादा लागू करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात साखरेचे दर काही प्रमाणात नियंत्रणात येण्याची शक्यता आहे.

**साठेबाजी व काळाबाजार रोखणार....**

- साखर प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांपेक्षा जास्त साठवणूक करता येणार नाही.
- कोणत्याही ठिकाणी ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साठा ठेवण्यास मनाई.
- साखर साठ्याची माहिती संबंधित सरकारी पोर्टलवर घोषित करणे बंधनकारक.
- निर्बंध १ ऑगस्ट ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत लागू.
- ३१ ऑक्टोबरपर्यंत १० लाख टन साखर आयातीला परवानगी.
- साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी आदेशाची सक्त अंमलबजावणी करण्याचे निर्देश.

सध्या अनेक ठिकाणी किरकोळ बाजारात ५० रुपये किलोच्या आसपास मिळणारी साखर ७० ते ८० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. वाढत्या दरामुळे ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, साखरेची साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारने अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील कलम ३ अन्वये २८ जुलै २०२६ रोजी साखर साठा मर्यादेबाबत अधिसूचना जारी केली आहे. नव्या आदेशानुसार कोणत्याही साखर विक्रेत्याला साखर प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवता येणार नाही. तसेच कोणत्याही वेळी, कोणत्याही ठिकाणी विक्रेत्याला ४ हजार क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.ही साठा मर्यादा १ ऑगस्ट २०२६ पासून लागू झाली असून ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत तिची अंमलबजावणी राहणार आहे. सर्व साखर विक्रेत्यांना अन्न व सार्वजनिक वितरण



विभागाच्या साखर साठा पोर्टलवर आपल्या साठ्याची माहिती घोषित करणे आणि ती नियमितपणे अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासनाच्या खात्यावरील साठा तसेच राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या विक्रेत्यांमार्फत रास्त भाव दुकानांमध्ये सार्वजनिक वितरणासाठी ठेवलेला साठा या निर्बंधातून वगळण्यात आला आहे.

दरवाढ नियंत्रणात आणण्यासाठी केंद्र सरकारने ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १० लाख टन साखरेच्या आयातीला परवानगी दिली आहे. देशातील साखरेचा पुरवठा वाढवून बाजारातील तुटवडा कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. शीतपेय आणि आईस्क्रीम उत्पादकांसह संबंधित व्यापारी व घाऊक ग्राहकांवरही साठा मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दरम्यान, देशातील अनेक राज्यांनी साखरेची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारकडे कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यामुळे साठा मर्यादा, साठ्याची ऑनलाइन नोंदणी आणि साखर आयात या तिन्ही उपाययोजनांमुळे बाजारातील कृत्रिम टंचाईला आळा बसून ग्राहकांना दिलासा मिळतो का, याकडे आता लक्ष लागले आहे.

# शेतात राबणाऱ्या हातांना आता 'शेतकरी'चा अधिकार !

### महाराष्ट्रातील कृषी संस्कृतीत महिलांच्या योगदानाला कायद्याची मान्यता; महिला शेतकरी वर्षाची ऐतिहासिक सुरुवात

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीत महिला कधीच केवळ शेतकरी कुटुंबातील सदस्य नव्हती; ती प्रत्यक्ष शेती करणारी, पिकांची निगा राखणारी, पशुधन सांभाळणारी आणि कुटुंबाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी वाहणारी अन्नदाती राहिली आहे. मात्र, तिच्या या कष्टाला 'शेतकरी' म्हणून अधिकृत ओळख मिळण्यासाठी दीर्घ काळ प्रतीक्षा करावी लागली. आता महाराष्ट्र सरकारने महिलांना शेतकरी दर्जा देणारा कायदा संमत केल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनप्रसंगी केली. उपस्थित महिलांनी या निर्णयाचे प्रतिनिधिक स्वरूपात स्वागत करत मुख्यमंत्र्यांना राखी बांधली. ही घटना केवळ एका शासकीय निर्णयाचे स्वागत नाही; तर महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीत अर्ध्या लोकसंख्येच्या योगदानाला मिळालेली अधिकृत मान्यता आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्याचे घोषित केले आहे. अशा पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. कारण महिला शेतीत काम करते हा आजवरचा सामाजिक स्वीकार आणि महिला स्वतः शेतकरी आहे ही कायदेशीर ओळख यामध्ये मोठा फरक आहे.

महाराष्ट्राची शेती ही केवळ आर्थिक व्यवस्था नाही; ती गावगाड्याच्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग आहे. पेरणीच्या पहिल्या सरीपासून कापणीच्या शेवटच्या दिवसापर्यंत शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून महिला राबत आली आहे. बी-बियाण्यांची निवड, रोपांची लागवड, खुरपणी, कापणी, मळणी, धान्याची साठवणूक, पशुपालन, दूध व्यवसाय, भाजीपाला आणि फळबागांची निगाया असंख्य कामांमध्ये तिचा वाटा आहे. अनेकदा पुरुष शेतात असेल तेव्हा महिला त्याच्या सोबत असते; पुरुष शहरात रोजगारासाठी गेला असेल तर संपूर्ण शेतीचा डोलारा तीच सांभाळते.

मात्र शेतीच्या कागदपत्रांवर तिचे नाव नसते. ही आपल्या कृषी व्यवस्थेतील सर्वांत मोठी विसंगती आहे. जिच्या हाताला मातीचा गंध आहे, तिच्या नावावर जमिनीचा सातबारा का नसावा? जिच्या श्रमामुळे पीक उभे राहते, तिला शेतकरी म्हणून कर्ज, विमा, अनुदान आणि सरकारी योजनांचा स्वतंत्र अधिकार का नसावा? या प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र सरकारच्या नव्या निर्णयात दडलेले आहे.

महिलांना शेतकरी दर्जा देण्याचा निर्णय प्रत्यक्षात किती व्यापक बदल घडवतो, हे पुढील काळात स्पष्ट होईल. मात्र, त्याची अंमलबजावणी प्रभावी झाली तर महिलांना संस्थात्मक कर्ज, कृषी योजनांचा लाभ, तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि बाजारपेठेशी जोडण्याचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील 'महिला' आणि स्वतंत्र 'महिला शेतकरी' या दोन ओळखीतील अंतर कमी होण्याची ही सुरुवात ठरू शकते.

महाराष्ट्राच्या संत परंपरेतही श्रम, समता आणि स्त्रीच्या कर्तृत्वाला महत्त्वाचे स्थान आहे. संत मुक्ताबाई, संत जनाबाईपासून अनेक संतपरंपरांनी समाजाला समानतेचा संदेश दिला. वारकरी परंपरेतील 'माऊली' ही संकल्पनाच मुळात मातृत्व, करुणा आणि समतेचा गौरव करणारी आहे. आज त्याच भूमीत महिला शेतकऱ्यांच्या श्रमाला कायद्याची मान्यता मिळणे हा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

संत गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाची माहिती दिली, ही बाबही प्रतीकात्मकदृष्ट्या महत्त्वाची आहे. हजारो-लाखो भाविकांच्या उपस्थितीत, वारकरी आणि कृषी संस्कृतीच्या साक्षीने महिलांना शेतकरी दर्जा देण्याचा निर्णय जाहीर झाला. उपस्थित महिलांनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधून या निर्णयाचे स्वागत केले. राखीचा हा धागा केवळ भावनिक नव्हता; तो शेतकरी महिलेच्या हक्काचा आणि सन्मानाचा धागा होता.

महाराष्ट्रातील शेतीसमोरील आव्हाने मात्र कमी झालेली नाहीत. निसर्गाचा लहरीपणा, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा आणि हवामान बदलाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. अशा परिस्थितीत महिलांवर शेतीची जबाबदारी वाढत आहे. त्यामुळे महिला शेतकऱ्यांना केवळ दर्जा देऊन थांबता कामा नये; त्या दर्जासोबत निर्णयाचा अधिकार आणि आर्थिक स्वायत्तता मिळाली पाहिजे.

महिला शेतकरी सक्षम करण्यासाठी जमिनीच्या मालकीची नोंद, महसूल अभिलेखांमध्ये नाव, संस्थात्मक कर्ज, किसान क्रेडिट कार्ड, पीकविमा, अनुदान, कृषी प्रशिक्षण आणि बाजारपेठेपर्यंत थेट प्रवेश या सर्व बाबींमध्ये महिलांना समान संधी मिळाली पाहिजे. महिला शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी यंत्रसामग्री विकसित झाली पाहिजे. घर आणि शेती या दुहेरी जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या महिलांसाठी सुरक्षित आणि श्रमबचत करणाऱ्या तंत्रज्ञानाला प्राधान्य मिळाले पाहिजे.

महिलांचा शेतीतील सहभाग केवळ श्रमापुरता मर्यादित राहू नये. उत्पादनानंतरची प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकिंग, ब्रँडिंग, थेट विक्री आणि कृषी उद्योजकता या क्षेत्रांतही त्यांना पुढे आणले पाहिजे. बचत गटांना बाजारपेठेशी जोडणे, डिजिटल आणि आर्थिक साक्षरता वाढवणे आणि महिलांच्या कृषी उत्पादनांना स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महिला शेतकऱ्यांच्या कामाचे अदृश्य स्वरूप संपले पाहिजे. घरकाम, मुलांचे संगोपन, पशुधनाची देखभाल आणि शेतातील श्रम यांची एकत्रित जबाबदारी पेलणाऱ्या महिलेच्या श्रमाचे आर्थिक मूल्य समाजाने मान्य केले पाहिजे. 'शेती पुरुषाची आणि घर महिला सांभाळते' ही पारंपरिक विभागणी वास्तवाशी विसंगत आहे. अनेक कुटुंबांत आज शेतीही महिला सांभाळते आणि घरही महिला सांभाळते. म्हणूनच महाराष्ट्र सरकारचा महिलांना शेतकरी दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ एका वर्गाला दिलेला दर्जा नाही. हा महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीतील एका ऐतिहासिक विसंगतीवर केलेला प्रहार आहे. आतापर्यंत शेतात राबणारी पण कागदावर अदृश्य असलेली महिला आता अधिकृत ओळखीच्या दिशेने पुढे जात आहे. २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' आहे. या वर्षी महाराष्ट्राने महिलांना शेतकरी दर्जा देण्याचा कायदा संमत केल्याची घोषणा केली, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. मात्र, या कायद्याची खरी परीक्षा त्याच्या अंमलबजावणीत आहे. कायद्याने 'शेतकरी' म्हटलेली महिला प्रत्यक्षात जमीन, कर्ज, विमा, बाजारपेठ आणि निर्णय प्रक्रियेचीही समान भागीदार झाली तरच या निर्णयाला ऐतिहासिक अर्थ प्राप्त होईल. संतांच्या भूमीत, वारकऱ्यांच्या भूमीत आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात शेतीचा कणा असलेल्या महिलेला तिच्या श्रमाची ओळख मिळणे ही काळाची गरज होती. आता हा अधिकार कागदावरून शेताच्या बांधावर पोहोचवण्याची जबाबदारी शासन, प्रशासन आणि समाजाची आहे. ज्या हातांनी महाराष्ट्राची शेती पिढ्यान्पिढ्या फुलवली, त्या हातांना आता 'शेतकरी' म्हणून सन्मान, अधिकार आणि निर्णयाची ताकद मिळाली पाहिजे. हीच महिला शेतकरी वर्षाची खरी फलश्रुती ठरेल.

# श्री दत्त दिगंबर पतसंस्थेच्या ठेवींमध्ये दुप्पट वाढ : राजेंद्र ढोमसे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील शहाजापूर येथील श्री दत्त दिगंबर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात उल्लेखनीय प्रगती साधत ठेवींमध्ये दुप्पट वाढ नोंदविली आहे. सभासद व ठेवीदारांनी संस्थेवर दाखविलेला वाढता विश्वास, संचालक मंडळाचा शिस्तबद्ध कारभार आणि कर्जवाटपातील काटेकोर धोरण यामुळे संस्थेची आर्थिक वाटचाल भक्कम होत असून हि अभिमानास्पद गोष्ट आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे आधारस्तंभ मा.आ. अशोकराव काळे आणि चेअरमन आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाचा संस्थेच्या प्रगतीत मोठा वाटा असल्याचे संस्थेचे चेअरमन राजेंद्र ढोमसे यांनी आवर्जून सांगितले.



श्री दत्त दिगंबर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ढोमसे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी उपस्थित सभासदांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी बोलताना राजेंद्र ढोमसे म्हणाले की, मागील आर्थिक वर्षात संस्थेच्या ठेवींमध्ये झालेली दुप्पट वाढ ही सभासद व ठेवीदारांचा संस्थेवरील दृढ होत असलेल्या विश्वासाची पावती आहे. संस्थेचा कारभार नियमबद्ध, पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने सुरू असून ठेवीदारांनी आपल्या आयुष्याची कमाई सुरक्षिततेच्या विश्वासाने संस्थेकडे ठेव स्वरूपात ठेवली आहे. संस्थेच्या एकूण ठेवी १० कोटी ४० लाख रुपये झाल्या असून हा विश्वास यापुढेही अधिक सक्षमपणे जपला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

संस्थेचे भागभांडवल २५ कोटी ७२ लाख रुपये, गुंतवणूक ५ कोटी ५७ लाख रुपये, तर कर्जवाटप ५ कोटी ५६ लाख रुपये असल्याची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळानुसार सहकार क्षेत्रातही आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक असून स्पर्धेच्या युगात इतर पतसंस्थांच्या बरोबरीने सभासदांना विविध ऑनलाईन सेवा व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सज्ज झाली आहे. ग्राहकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित सेवा देण्यावर यापुढेही भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेत संस्थेचा वार्षिक अहवाल संस्थेचे मॅनेजर विलास हाडोळे यांनी सादर केला. श्रद्धांजलीचा ठराव संजय सूर्यवंशी यांनी मांडला. याप्रसंगी बाळासाहेब काळे, माणिकराव चंद्रे, मच्छिंद्र देशमुख, संजय सूर्यवंशी, अमोल कोळपे, विजय वर्पे, गणेश बोरसे, शरद ढोमसे, श्रीपाद दळवी, बाळासाहेब खैरे, अशोक भुजबळ, गणेश नन्नवरे, सतीश जाधव, राजेंद्र दंडगव्हाळ, राजेंद्र शुक्ला,संजय गाडे, किरण निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

# रामानंद संप्रदायाच्या अध्यात्म व सेवेचा जागर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या कृपा शीर्वादाने व पिठाचे उत्तराधिकारी परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या दिव्य प्रेरणेने संगमनेर येथे महिला संघटन मेळावा भक्तीमय व उत्साही वातावरणात रामानंद संप्रदायाच्या अध्यात्म व सेवेचा जागर या मेळाव्यास अखिल भारतीय महिला सेक्रेटरी सौ. वृंदाताई जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी संघटनात्मक कार्य हीच खरी ईश्वर सेवा असल्याचे सांगून, संघटनेच्या माध्यमातून अध्यात्मिकतेची कास धरून कुटुंब, समाज आणि राष्ट्रहिताचे कार्य कसे करावे, याकडे महिलांचे लक्ष वेधले. प्रत्येक महिलेने नामस्मरण, सेवा आणि समर्पण या त्रिसूत्रीने जीवन उज्वल करावे, असा अध्यात्मिक संदेश त्यांनी दिला.

या मेळाव्यास उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यातील पिठ समिती सदस्य ,असंख्य माताभगिनी, संग्राम सेना युवा सेना मोठ्या श्रद्धेने आणि उत्स्फूर्तपणे हजेरी लावली होती. हरिनामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी जिल्हा सेवा समिती, सर्व तालुका सेवा समित्या व सेवा केंद्र सेवा समितीच्या सेवकांनी विशेष परिश्रम घेऊन अनमोल सहकार्य केले. त्याबद्दल




जिल्हा सेवा समिती, उत्तर अहिल्यानगरच्या वतीने सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# अण्णाभाऊ साठेंच्या पुतळा लोकार्पणाचे कार्यक्रम हाणून पाडले : आ. काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :-** लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे हे स्मारक अविरतपणे प्रेरणा देणारे असल्यामुळे या पुतळ्याचे लवकरात लवकर अनावरण व्हावे हि माझी मनापासून इच्छा होती. त्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केले. अनेक वेळा त्यासाठी स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्यासह अनेक मंत्र्यांची वेळपण घेतली. तसेच आण्णाभाऊ साठे यांचे वंशज सचिनभाऊ साठे यांच्याशी पण पुतळ्याचे अनावरणासाठी कार्यक्रमाचे आयोजन ठरविले मात्र अनेक कार्यक्रम जाणीवपूर्वक हाणून पाडले. ते कोणी पाडले? कशासाठी पाडले याचे उत्तर आण्णाभाऊ साठे प्रेमी देतीलच पण आज या पुतळ्याचे लोकार्पण झाले याचा विशेष आनंद होत असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले.

कोपरगाव शहराच्या वैभवात भर घालणारा साहित्यरत्न डॉ. लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती स्मारकाचे




लोकार्पण राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीशजी महाजन यांच्या हस्ते पार पडले याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, स्व.कर्मवीर शंकररावजी काळे, स्व. शंकररावजी कोल्हे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी जागा निश्चित करण्यासाठी प्रयत्न केले. मंत्री स्व.बाबुराव बारस्कर, केंद्रीय समाजकल्याणमंत्री रामदासजी आठवले साहेब यांच्या पुढाकारातून पुतळा बसविण्यासाठी जागा निश्चित केली. माजी नगराध्यक्ष विजय वहाडणे यांच्या काळात पूर्णाकृती पुतळा बसविण्यात आला. लोकप्रतिनिधी म्हणून स्मारकाचे लोकार्पण करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे साहेब, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे वंशज सचिनभाऊ साठे या सगळ्यांच्या माध्यमातून स्मारकाचे लोकार्पण करण्याचा प्रयत्न केला. मात्र काय राजकारण झाले आणि अनेक लोकार्पनाचे होणारे कार्यक्रम हाणून पाडण्यात आले असल्याची खंत आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केली. तसेच ज्या समाज बांधवांनी डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती स्मारकाचे लोकार्पण होण्यासाठी संघर्ष, उपोषण, आंदोलन आणि स्मारकासाठी पाठपुरावा केला अशा सगळ्या समाज बांधवांचे त्यांनी अभिनंदन करून आभार मानले.

याप्रसंगी खा.भाऊसाहेब वाकचौरे,संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनराव कोल्हे, विधानपरिषद आ. विवेक कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान, कोपरगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजित निकत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आजी माजी नगरसेवक, समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरासमोरील इर्टिगा व शाईन गाडी पेटवली, संशयीतावर गुन्हा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** घरासमोर उभी असलेली इरटिगा व शाईन गाडी अज्ञात इसमाने पेटवुन दिल्याची घटना दि. २५ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास राहुरी तालुक्यातील टाकळीमियॉं येथे घडली. या घटनेत दोन्ही वाहने जळून खाक झाली आहेत.

संतोष रामचंद्र शिंदे, वय ३५ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील टाकळिमियाँ येथील खळवाडी येथे राहत असून त्यांचा गाडीचा व्यवसाय आहे. त्यांच्याकडे इरटिगा क्र. एम एच ४३ ए एल २२८१ व होंडा शाईन क्र. एम एच १७ सी डी ११७० अश्या दोन गाड्या आहेत. दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री संतोष शिंदे यांनी त्यांची इरटिगा व शाईन गाडी घराच्या समोर लावलेल्या होत्या. दि. २५ ऑगस्ट रोजी पहाटे १.३० वाजेच्या सुमारास संतोष शिंदे यांना अचानक झोपेतुन जाग आली. तेव्हा घरासमोरील त्यांच्या दोन्ही गाड्यांना कोणीतरी पेटवून दिले. संतोष शिंदे यांनी आरडा ओरडा केल्याने आजूबाजूचे काही लोक जागे झाले त्यांनी पाणि मारुन आग विझवली. या घटनेत दोन्ही वाहने जळून खाक झाली आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले.

संतोष शिंदे यांची पत्नी मयत झालेली असुन त्यांना दुसरा विवाह करवयाचा असल्याने त्यांची पाथर्डी तालुक्यातील आडगाव येथील दिपक मुळे याच्याशी ओळख झाली होती. त्याने संतोष शिंदे यांना दुसरा विवाह करण्या बाबत विचारणा केली होती. दोन दिवसापुर्वी शिंदे व मुळे यांच्यात किरकोळ वाद झाले होते. तेव्हा मुळे हा शिंदे यांना म्हणाला होता की, मी तुझ्या गाड्या पेटवुन देतो, अशी धमकी दिली होती.

सदर दोन्ही वाहने दिपक मुळे याने पेटवुन दिल्याचा संशय संतोष रामचंद्र शिंदे यांनी व्यक्त केला. आणि राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात हवालदार विजय नवले हे करीत आहे.

# टाकळीभान मंडळातील शेतकऱ्यांना खरीप पिकविमा न मिळाल्याने निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान मंडळात खरीप हंगाम-२०२५ अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे कापुस पिकाचे आतोनात नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम न मिळाल्याने त्यांनी अहिल्या नगर जिल्ह्याचे पालकमंत्री व विविध शासकीय कार्यालयांना निवेदने दिली आहेत. व पिक विमा भरपाई मिळण्यासाठी मागणी केली आहे. सदर निवेदनात म्हटले आहे की टाकळीभान परीसरातील शेतक-यांनी सन २०२५ खरीप हंगामामध्ये कपाशी पिकाचा पंतप्रधान पिकविमा उतरविला होता तरी सदर पिक विमा उतरवलेल्या ॲग्रीकल्चर कंपनीने कॅक्युलेशन करुन क्लेम रक्कम झिरो दाखविली आहे. व कंपनीच्या हेप्ललाईन वर संपर्क केल्यास ते पिक विमा मिळत नसल्याचे सांगत आहे.

तरी अतिवृष्टी होवुनही विमा कंपनीकडुन कुठलीही मदत मिळाली नाही. अतिवृष्टी झाली त्यावेळेस शासनाने सर्व शेतक-यांचे नुकसानीचे पंचनामे देखील केले होते त्यामुळे विमा कंपनी शेतकऱ्याला कोणत्या आधारावर विमा नाकारते याची चौकशी होवुन सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळावा. अशी शेतकऱ्यांनी मागणी आहे. आणि त्याच मंडळात सोयाबिन पिकासाठी खरीप-२०२५ चा पिकविमा सोयाबिनसाठी पिक विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना मिळालेला आहे. तरी कापुस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, तरी याबाबत पिक विमा उतरविलेल्या सर्व शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असुन कुठलीही पुर्व सुचना न देता तिव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही पिक विम्याच्या लाभापासून वंचित शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. तरी याबाबत तत्परतेने कार्यवाही होऊन न्याय मिळावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. निवेदनावर भाऊसाहेब पटारे, सुनील बोडखे,अक्षय कोकणे, अनिल बोडखे, सुजित बोडखे,मच्छिंद्र पटारे, नवनाथ पटारे, दत्तात्रय पटारे, पोपटराव कोकणे, गणेश शेळके, ज्ञानेश्वर पवार,संजय पटारे,गंगाधर पटारे, सुरेश पटारे, भाऊसाहेब गव्हाणे आदींच्या सह्या आहेत. सदर निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, ता.महसूल विभाग, कृषी विभाग यांना देण्यात आल्या आहेत.

# शेतकरी-शास्त्रज्ञ मंचातून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या माध्यमातून राहुरी तालुक्यातील मानोरी येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाची बैठक आयोजित करण्यात आली. शेतकऱ्यांच्या कृषीविषयक समस्या जाणून घेऊन त्यावर शास्त्रीय पद्धतीने उपाययोजना सुचविणे तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करणे हा या मंचाचा मुख्य उद्देश आहे.

बैठकीस कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, कृषिविद्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दत्तात्रय पाचरणे, उद्यानविद्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. अन्सार अत्तार, पशुविज्ञान व दुग्धशास्त्र विषयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुनील अडांगळे, कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने आणि सहाय्यक कृषी अधिकारी सारिका हरिश्चंद्रे उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. खर्डे यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाचा उपक्रम सुरू असल्याचे सांगितले. शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यात सातत्याने संवाद झाल्यास कृषी क्षेत्रातील समस्या सोडविण्यास मोठी मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. पाचरणे यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान, प्रा. अत्तार यांनी फळपिके व भाजीपाला उत्पादन, तर डॉ. अडांगळे यांनी दुग्धव्यवसाय व चारा पिकांबाबत मार्गदर्शन केले. कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने यांनी शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनातून तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा शेतात वापर केल्याने उत्पादन वाढल्याचा अनुभव सांगितला.

शेतकरी शिवाजी थोरात यांच्या शेतावर झालेल्या बैठकीत 'खेत बचाव अभियान' व संतुलित खत व्यवस्थापनावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच माधव पिले यांच्या रुंद वरंबा-सरी पद्धतीने लागवड केलेल्या सोयाबीन प्रक्षेत्राला भेट देण्यात आली. यावेळी सरपंच बापूसाहेब वाघ यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रक्तदानातून मानवतेचा संदेश; राहुरीत ब्रह्माकुमारीजतर्फे भव्य रक्तदान शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :**डॉ. दादी प्रकाशमणी यांच्या १९व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच विश्वबंधुत्व दिनाचे औचित्य साधून राहुरी येथील ब्रह्माकुमारीज राजयोग भवन सेवा केंद्रात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. दादी प्रकाशमणी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सेवा केंद्राच्या संचालिका नंदादीदी यांनी व्यसनमुक्तीचे महत्त्व सांगितले. व्यसन ही समाजाला लागलेली विषारी कीड असून तरुणांनी व्यसनापासून दूर राहून निरोगी जीवनाचा स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. रक्तदान हे जीवनदान असून एका व्यक्तीच्या रक्तदानातून तीन जणांचे प्राण वाचू शकतात, असेही त्यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी ब्रह्माकुमारीजच्या उपक्रमाचे कौतुक करत तरुणांनी व्यसनाच्या आहारी न जाता व्यसनमुक्त जीवन जगावे, असे आवाहन केले. कृषी अधिकारी बापूसाहेब शिंदे व डॉक्टर असोसिएशनचे तालुकाध्यक्ष डॉ. प्रसाद ढुस यांनीही आयोजकांचे अभिनंदन केले.



अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व त्यांच्या पथकाने रक्तदान शिबिरासाठी सहकार्य केले. राहुरी शहरातील शिक्षक, व्यापारी, शेतकरी, तरुण तसेच ओम शांती परिवारातील बंधू-भगिनींनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. रक्तदात्यांना प्रशस्तीपत्र व रक्तदान कार्ड देण्यात आले. यावेळी डॉ. प्रदीप रोकडे यांनी मोफत दंत तपासणी केली. कार्यक्रमात दै. राष्ट्र सह्याद्रीचे तालुका प्रतिनिधी राजेंद्र परदेशी यांच्यासह पत्रकार व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. नंदादीदी व सहकाऱ्यांनी उपस्थितांना राखी बांधून व्यसनमुक्तीचा संकल्पही करून घेतला.

# नाशिक कारागृहाची रवानगी टाळण्यासाठी महिला आरोपीचा सर्पदंशाचा बनाव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी होण्याची शक्यता असताना महिला आरोपीने पायाला साप चावल्याचा बनाव केल्याची घटना नेवासे येथे समोर आली. अहिल्या दत्तात्रेय मैराळ (३८, रा. गंगापूर) हिला बालविवाहाच्या प्रकरणात १८ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली होती. तिच्याविरुद्ध नेवासे पोलिस ठाण्यात पॉक्सो, बालविवाह प्रतिबंधक कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल आहे.

पोलीस कोठडीची मुदत संपत आल्याने तिची न्यायालयीन कोठडीत रवानगी होणार होती. सोमवारी (दि. २४) सकाळी आठच्या सुमारास तिने लॉकअपमध्ये आरडाओरड करून पायाला साप चावल्याचे सांगितले. पोलिसांनी तत्काळ तिला नेवासे फाटा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले.

घाटीतील वैद्यकीय तपासणीत सर्पदंश झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे पोलिसांनी लॉकअपमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात मैराळ स्वतःच्या पायाला पिनने टोचत असल्याचे दिसून आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे सर्पदंशाचा दावा बनाव असल्याचे स्पष्ट झाले. वैद्यकीय तपासणीनंतर तिला पुन्हा नेवासे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, रवानगी टाळण्यासाठीच हा प्रकार केल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# रेशनच्या धान्याला ग्रहण

## सात्रळमध्ये वितरण व्यवस्थेचा भोंगळ कारभार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : सात्रळ येथील ग्रुप विकास कार्यकारी सहकारी सोसायटीमार्फत चालविण्यात येणाऱ्या स्वस्त धान्य दुकानात ऑगस्ट महिन्याच्या रेशन धान्याच्या कोट्यात आलेल्या गव्हाच्या गोणीत चक्क सिमेंट व खडीमिश्रित दोन दगड आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या दगडांचे एकूण वजन तब्बल १ किलो २०० ग्रॅम असल्याचे सांगण्यात येत असून, धान्य वितरण व्यवस्थेच्या गुणवत्तेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



ऑगस्ट महिन्यासाठी सात्रळ येथील स्वस्त धान्य दुकानात एकूण ३९२ गोण्या धान्याचा कोटा प्राप्त झाला आहे. यामध्ये १५२ गोण्या तांदूळ तर २४० गोण्या गहू आहेत. यापैकी गव्हाची गोणी उघडून धान्य तपासणी करताना त्यामध्ये सिमेंट व खडीचे मिश्रण असलेले दोन मोठे दगड आढळून आले. त्यामुळे दुकानदारासह ग्रामस्थांमध्येही आश्चर्य व्यक्त होत आहे.

**वारंवार खडे, घाण अन् प्लास्टिकचे तुकडे**

रेशनच्या धान्यात घाण, बारीक खडे, प्लास्टिकचे कागद व इतर परकीय वस्तू आढळण्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत. त्यातच आता थेट गव्हाच्या गोणीत मोठे दगड आढळल्याने धान्याच्या गुणवत्तेची तपासणी नेमकी कुठे आणि कशी केली जाते, असा सवाल उपस्थित होत आहे.

इतकेच नव्हे तर गोण्यांमध्ये अपेक्षित वजनापेक्षा धान्य कमी येत असल्याचीही तक्रार आहे. यापूर्वी सदर संस्थेने गोण्यांमध्ये धान्याची तूट येत असल्याबाबत तालुका वितरण अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली होती. मात्र, या तक्रारीवर अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप संस्थेकडून करण्यात आला आहे.

**तुटीचा फटका थेट ग्राहकांना**

गोणीत धान्य कमी आल्याने वितरणाच्या वेळी नागरिकांना प्रत्येकी साधारण ३०० ते ५०० ग्रॅम धान्य कमी द्यावे लागत असल्याचे सांगण्यात येते. परिणामी नागरिकांचा रोष स्वस्त धान्य दुकानदारांवर व्यक्त होत असून, प्रत्यक्षात वितरण व्यवस्थेतील तुटीचा फटका दुकानदार आणि ग्राहक दोघांनाही सहन करावा लागत आहे.

रेशन दुकानात धान्य पोहोचण्यापूर्वी त्याची गुणवत्ता, वजन आणि शुद्धता यांची काटेकोर तपासणी करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेची आहे. मात्र, या प्रक्रियेत हलगर्जीपणा होत असल्यास त्याचा थेट परिणाम गरीब व गरजू लाभार्थ्यांच्या अन्नधान्यावर होत आहे.

**प्रशासनाने तातडीने चौकशी करावी**

सात्रळमधील या प्रकाराची संबंधित वितरण विभागाने तातडीने चौकशी करून गव्हाच्या गोणीत दगड कसे आले, धान्याचे वजन कमी का पडते आणि यापूर्वीच्या तक्रारींवर कारवाई का झाली नाही, याचा शोध घ्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. भविष्यात रेशनच्या गोण्यांमध्ये परकीय वस्तू किंवा वजनाची तूट आढळू नये, यासाठी वितरण व्यवस्थेची कठोर तपासणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

## द•ख•ल

### पटेल हायस्कूलच्या मनोज वाघची सुवर्ण भरारी



**श्रीरामपूर** : येथील पटेल हायस्कूलचे माजी विद्यार्थी मनोज वाघ यांनी आपल्या कर्तृत्वाने शाळेचा व शहराचा नावलौकिक वाढवला आहे. पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्विमिंग स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक पटकावले असून बेंगलोर येथे होणाऱ्या आशियाई मास्टर स्विमिंग स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. पुण्यातील प्रतिष्ठित स्पर्धेत राज्यभरातील नामवंत जलतरणपटू सहभागी झाले होते. चुरशीच्या स्पर्धेत मनोज यांनी उत्कृष्ट तंत्र व वेगाच्या जोरावर पहिला क्रमांक मिळवला. या यशाबद्दल मुख्याध्यापक दिलीप शेवाळे, ज्येष्ठ शिक्षक फारुख सय्यद व सर्व शिक्षकवृंदाने त्यांचा गौरव करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

### स्पर्धा परिक्षेसह विविध क्षेत्रातील गुणवंतांचा तक्षशिला विद्यालयाकडून सन्मान




**बालाजी देडगाव** : तक्षशिला इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या मान्यवरांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सब-रजिस्ट्रार ग्रेड-१, सहाय्यक कक्ष अधिकारी आणि राज्य कर निरीक्षक या तिन्ही पदांवर दैदिप्यमान यश मिळवल्याबद्दल कुमारी प्राजक्ता संजय कचरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच, डढख पद प्राप्त केल्याबद्दल राजेंद्र आठरे यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विठ्ठल कदम यांनी केले, सूत्रसंचालन श्रुतिका उगले यांनी तर उपप्राचार्य संदीप खाटीक यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजय कदम यांनी मदत केली.

### दारूच्या नशेत स्कूटर चालवणाऱ्या तरुणावर गुन्हा



**शिंगणापूर** : दारूच्या नशेत स्कूटर चालविताना वाहनावरील नियंत्रण सुटून धोकादायक पद्धतीने वाहन चालविल्याप्रकरणी शनीशिंगणापूर पोलिसांनी २१ वर्षीय तरुणाविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई रविवारी (दि. २३ ऑगस्ट) सायंकाळी शिवांजली सर्कल परिसरात करण्यात आली. फकीर मैनोद्दीन पठाण (वय २१, रा. मारुती मंदिराजवळ, चार नंबर चारी, शिंगणापूर, ता. नेवासा) हा एमएच १७ सीए ६६३८ क्रमांकाची स्कूटर घेऊन शिवांजली सर्कल परिसरातून जात होता. त्यावेळी त्याने मद्यप्राशन केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. नशेच्या अवस्थेत वाहनावर नियंत्रण ठेवता येत नसल्याने पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली. याप्रकरणी पोलिस कर्मचारी सुरेश दौलत जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शनीशिंगणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४६/२०२६ अन्वये मोटार वाहन कायदा कलम १८५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजता घडली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बी. एन. कारखिले पुढील तपास करीत आहेत.

# राहुरीत आजपासून त्रिदिनी कार्यक्रम सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : शहरातील कानिफनाथ चौक येथे श्री कानिफनाथ महाराज मंदिरात चैतन्य कानिफनाथ महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार दि. २६ ते शुक्रवार २८ ऑगस्ट असा तीन दिवसाच्या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज बुधवारी सकाळी ९ ते ४ या वेळेत प्रायश्चित्त संकल्प, प्रधान संकल्प, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, आयुष्य मंत्रजप, कुंड पूजन, मंडळ स्थापना, कुटीर होम, नवग्रह हवन, जलाधिवास, सायं पूजन व महाआरती आदी कार्यक्रम होणार आहेत.

गुरुवार २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत प्रातः पूजन, शांती सूक्त, स्थापित देवता पूजन, विशेष हवन, मंत्रविधी, हवन, तत्त्व न्यास, शय्याधिवास निद्रा आवाहन, सायं पूजन व महाआरती होईल. शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी शांती सूक्त, मंडळ पूजन, देवता पूजन, प्रधान हवन, उत्तरांग हवन, बलिदान, कानिफनाथ देवता प्राणप्रतिष्ठा, पूर्णाहुती व महाआरती होणार आहे.

मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त सकाळी ११.११ वाजता असून, त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्यास मस्तनाथ महाराज (बजरंग महाराज) तसेच बाळकृष्ण विश्वंभर कुलकर्णी (बालब्रह्मचारी) यांची उपस्थिती राहणार आहे.

# धर्म सत्तेचा नव्हे, माणुसकीचा मार्ग; डॉ. सुधीर तांबे

## ‘ओळख इस्लामची’ ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : धर्माची निर्मिती माणसाला माणसाशी कसे वागावे, याचे मूल्याधिष्ठित नियम देण्यासाठी झाली आहे. कोणताही धर्म हिंसा, द्वेष किंवा दुसऱ्याला दुःख देण्याची शिकवण देत नाही. माणुसकी, समता, प्रेम आणि बंधुभाव हीच सर्व धर्मांच्या केंद्रस्थानी असलेली मूल्ये आहेत. त्यामुळे धर्माचा वापर सत्तेच्या राजकारणासाठी नव्हे, तर समाजात सलोखा निर्माण करण्यासाठी व्हावा, असे प्रतिपादन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.




मानवता संदेश फाऊंडेशन, श्रीरामपूर आणि अहिल्यानगर जिल्हा उर्दू साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने ईद-ए-मिलादनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण लिखित ‘ओळख इस्लामची’ या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष करण ससाणे होते. आमदार हेमंत ओगले, मुफ्ती मोहम्मद रिजवान, सिद्धार्थ मुरकुटे, डॉ. वसंत जमधडे, अशोक उपाध्ये, रवींद्र गुलाटी, राजेंद्र पवार, डॉ. दिलीप शिरसाट, बिट्टू कक्कड, जावेद शेख, गटशिक्षणाधिकारी दीपक त्रिभुवन आदी उपस्थित होते.

डॉ. तांबे यांनी धर्माच्या मानवतावादी भूमिकेवर प्रकाश टाकताना प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी एकेश्वरवादासोबत समता, बंधुभाव आणि ज्ञानसाधनेचा संदेश दिल्याचे सांगितले. संत तुकारामांसह भारतीय संतपरंपरेनेही धर्माचा खरा अर्थ माणुसकी व सदाचारात असल्याचे अधोरेखित केले आहे, असे त्यांनी नमूद केले. आमदार हेमंत ओगले यांनी ‘ओळख इस्लामची’ ग्रंथातून इस्लाममधील मानवतावाद, शांतता, समता आणि सर्वधर्मसमभावाचे अभ्यासपूर्ण विवेचन झाल्याचे सांगितले. पत्रकार विकास अंत्रे यांनी ग्रंथाचा आशय मांडला, तर लेखक सलीमखान पठाण यांनी ग्रंथनिर्मितीमागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार करण नवले यांनी केले. स्वागत जमीन बागवान, सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले. आभार अशोक उपाध्ये यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक, साहित्यप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


निशाणी नंबर : ०६
दिनांक : २४/०८/२०२६
नेमलेली तारीख ३०/०९/२०२६

**जाहीर नोटीस**

ॲड.ए.आर.पठाण
नेवासा कोर्ट, मो नं.९८२२०५०९३७

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब, ज्यु.डी यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं.११३/२०२६

**अर्जदार**–हुसेन इब्राहिम बागवान वय ७७, धंदा शेती रा. नेवासा खुर्द ता. नेवासा जि.अ.नगर

**सामनेवाले**
कुणीही नाही

**मयत**
रहिम शहाबुद्दीन बागवान मयत दिनांक १३/०७/१९८२

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयामध्ये मयतास वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला असून मयत रहिम शहाबुद्दीन बागवान हे दिनांक १३/०७/१९८२ रोजी मयत झालेले असून मयतास अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार यांनी मयत रहिम शहाबुद्दीन बागवान यांचे नावावर मौजे नेवासा खुर्द ता. नेवासा येथील नगर भु मापन क्रमांक (सिटीसर्व्हे) नंबर २१६७ क्षेत्र ६८.३० चौ.मि व सिटीसर्व्हे २१६५ क्षेत्र ३६.२० चौ. मिटर या मिळकतीस मयत रहिम शहाबुद्दीन बागवान यांचे नावाची रेकॉर्डला नोंद होती व आहे. तसेच मयत झाल्यानंतर अर्जदार यांनी मा. उपअधिक्षक भूमि अभिलेख नेवासा खुर्द ता. नेवासा यांचेकडे जावुन नोंद लावण्याबाबत विनंती केली असता मा. उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी यांनी दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्जदार यांना मा. कोर्टाचे वारस प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सांगितले व त्यांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली. म्हणून सदरचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला होता व आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही एक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि. ३०/०९/२०२६ रोजी पर्यंत किंवा ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा नेमलेली तारीख : ३०/०९/२०२६

**कनिष्ठ लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय,**
**क.स्तर नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सहा अधिक्षक**
**सह. दिवाणी न्यायालय,**
**नेवासा न्यायालय, क.स्तर**


# नवनिर्वाचित अध्यक्ष कर्डीले यांचा सन्मान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : सेवा सहकारी सेवा सोसायटीमार्फत होणाऱ्या पीक कर्ज, ६%, दराने घेऊन वर्षभरात परत फेड केल्यास ०%चा लाभ घ्यावा, व दीर्घ मुदतीचे कर्ज जसे संकरीत गाय, पाईप लाईन, डाळिंब, घरकुल, आदी मध्यम मुदतीचे कर्ज घेऊन पैशाचा योग्य विनियोग करून हे असलेले १३% व्याज दराचे कर्ज हप्ता मुदतीतच फेड करून सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन कांगोणी सोसायटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष मच्छिन्द्र सावळेराम कर्डीले यांनी केले. कर्डीले यांचा निवडीबद्दल मुळा बँकेच्या वतीने सन्मान केला तेव्हा ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुळा बँकेचे अध्यक्ष माणिकराव होंडे हे होते. याप्रसंगी उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे, संचालक जालिंदर एळवंडे, रामभाऊ कराळे, एस.के. दरंदले,व्यवस्थापक कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# अमृतवाहिनीच्या संबोधी आहेरचे राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : दि. १५ ऑगस्ट रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या सप्तरंग कल्चरल फेस्टिव्हलच्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनमध्ये अमृतवहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, अमृतनगर येथील विद्यार्थिनी कु. संबोधी आहेर हिने आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत दोन पारितोषिके पटकावून राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे संबोधी आहेर हिने सेमी-क्लासिकल मॉडेल डान्स या प्रकारात आपल्या अप्रतिम नृत्याविष्काराने परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तसेच सोलो सिंगिंग - लोकगीत या प्रकारातही तिने आपल्या सुरेल व दमदार गायनाने परीक्षकांची दाद मिळवत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले. नृत्य आणि गायन या दोन्ही कला प्रकारांत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करून तिने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या दुहेरी यशाबद्दल तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


**जाहीर नोटीस**

तंजीला शेख,
ॲडव्होकेट, श्रीरामपुर,

प्रो.फी जमा रु.
प्रो.पा.नं.
ने.ता. २१/९/२०२६
ता. १८/०८/२०२६

श्रीरामपुर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब.जे.डी. यांचे कोर्टात
वा.चौ.अ. क्रमांक ६१/२०२६

नि. ६.
१. कचरु मारुती लांडे, वय-७७ वर्षे, धंदा-शेती,
२. प्रयागाबाई कचरु लांडे, वय-६३ वर्षे धंदा-घरकाम, दोघेही रा.लांडे वस्ती नायगांव ता. श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर-**अर्जदार**-
विरुध्द-कोणीही नाही
**सा.वाले**

अर्ज-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक १ व २ यांची मुलगी जनाबाई कचरु लांडे हीचे दिनांक ४/३/२०२६ रोजी आजारपणामुळे दुःखद निधन झालेले आहे, कै. जनाबाई लांडे ही अविवाहीत होती, तीचा लहान पणापासुन पालन पोषण, औषध उपचार सांभाळ, संगोपन ईत्यादी अर्जदार यांनीच केलेले आहे. त्यामुळे अर्जदार क्रमांक १ व २ हेच कै. जनाबाई कचरु लांडे हीचे कायदेशिर वारस असुन अर्जदार क्रमांक १ व २ यांचे नांवाने वारस दाखला मिळणेबाबत सदरचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदारांचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेबाबत आदेश केला जाईल.

आजरोजी २५/०८/२०२६ माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

**कामगिरी क्लार्क,**
**३ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर**
**श्रीरामपुर**

**हुकूमावरून**
**सहायक अधिक्षक, दिवाणी**
**न्यायालय, क स्तर, श्रीरामपुर**



**जाहिर प्रगटन**

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु/एस/आर २२७/२०२६
नेवासा दिनांक ०७/०८/२०२६

अर्जदार श्री श्रीम-गुलाबनबी आमीरभाई शेख रा. खेडले परमानंद ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री श्रीम. कु. गुलाबनबी आमीरभाई शेख रा. खेडले परमानंद ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-गुलाबनबी आमीरभाई शेख, गावाचे नाव-खेडले परमानंद, जन्म दिनांक-०१/०६/१९६६

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**


# ‘आनंदी जीवनाची गुरुकिल्ली’चा मंत्र

## समता पतसंस्थेच्या स्नेहमेळाव्याने जिंकली ज्येष्ठांची मने

सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : ज्येष्ठ नागरिक म्हणजे समाजाची अनुभवसंपन्न शिदोरी आणि पुढील पिढीची प्रेरणास्थाने, ही भावना मनात ठेवून नेवासा येथील समता पतसंस्थेच्या वतीने सभासद व ज्येष्ठ नागरिकांसाठी मोहिनीराज मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हास्य, आपुलकी, संवाद आणि सामाजिक बांधिलकीने भारलेल्या या मेळाव्यामुळे ज्येष्ठांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते अशोक देशमुख यांच्या ‘आनंदी जीवनाची गुरुकिल्ली’ या विषयावरील प्रभावी व्याख्यानाने मेळाव्याला विशेष रंगत आली.

आयुष्याच्या उत्तरार्धातही आनंदी, समाधानी आणि तणावमुक्त जीवन कसे जगावे, याबाबत त्यांनी अत्यंत सोप्या व मिश्कील शैलीत केलेले मार्गदर्शन उपस्थितांच्या मनाला भिडले. यावेळी समता पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष काका कोयटे यांनी पतसंस्थेच्या ४० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. सभासदांनी ठेवलेल्या विश्वासामुळे समता पतसंस्थेला ‘अ’ वर्ग दर्जा मिळाला असल्याचे सांगत, आयुष्यात कोणाला फसवले नाही आणि फसवणारही नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी व्यक्त केली.समता पतसंस्थेच्या माध्यमातून कोपरगाव येथे सुरू असलेल्या मानवतेचे मंदिर, जलमंदिर, अभ्यासमंदिर, आरोग्यमंदिर आणि उद्योगमंदिर या विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. तर अनाथ व ज्येष्ठ नागरिकांना मोफत जेवणाचे डबे पोहोचवून त्यांना भोजन उपलब्ध करून देण्याचे सेवाकार्य ही पतसंस्थेच्या माध्यमातून सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकसेवेला प्राधान्य देत समता पतसंस्थेला आम्ही ‘सहकार मंदिर’ हे नाव दिले आहे. पतसंस्थेला झालेला १३ कोटी १९ लाख रुपयांचा नफा हा सभासदांच्या विश्वासातून निर्माण झालेला असून तो आपल्या सर्वांच्या मालकीचा आहे, असे सांगत चांगल्या सामाजिक कार्यासाठी समता पतसंस्थेला साथ देण्याचे आवाहन कोयटे यांनी केले. ‘दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी व्हा; जीवन आपोआप आनंदी होईल’ ‘आनंदी जीवनाची गुरुकिल्ली’ या विषयावर मार्गदर्शन करताना व्याख्याते अशोक देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकांसह सर्व वयोगटातील नागरिकांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा संदेश दिला. आनंदी राहायचे असेल तर मित्रांशी बोला, दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी व्हा, चालण्याची सवय लावा, मुलाकडे सुनेची तक्रार करू नका, आहे त्यात समाधान मानायला शिका, अंधश्रद्धेपासून दूर राहा आणि पैसा केवळ साठवून न ठेवता स्वतः च्या आनंदासाठीही योग्य पद्धतीने खर्च करा, असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. त्यांच्या विनोदी, ओघवत्या आणि वास्तव जीवनाशी जोडलेल्या मार्गदर्शनामुळे सभागृहात अनेकदा हास्यकल्लोळ निर्माण झाला.




ज्येष्ठ नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या विचारांना दाद दिली. समाजसेवेच्या उपक्रमांचे कौतुक मेळाव्यात ज्येष्ठ व्यापारी रमेश ओस्तवाल, बालेंद्र पोतदार, डॉ. मुरलीधर कराळे, बाळासाहेब मारकळी, सतीश मुळे सर, अमृत फिरोदिया, रामभाऊ केंदळे, एकनाथ डोहळे तसेच जिल्हा परिषद मुलींच्या शाळेतील शिक्षक अरविंद घोडके यांनी मनोगत व्यक्त केले. समता पतसंस्थेने आयोजित केलेला हा स्नेहमेळावा ज्येष्ठ नागरिकांसाठी केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न ठरता त्यांना आनंद, आत्मविश्वास आणि पुढील आयुष्यासाठी नवी ऊर्जा देणारा उपक्रम ठरल्याचे त्यांनी सांगितले.

पतसंस्थेच्या सामाजिक बांधिलकीचेही त्यांनी विशेष कौतुक केले.नेवासा तालुक्यातील महिला व ज्येष्ठ नागरिक या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित महिला व ज्येष्ठ नागरिकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोरक्षनाथ चव्हाण यांनी केले. समता पतसंस्थेच्या नेवासा शाखेचे सिनियर ऑफिसर अमोल दिवटे यांनी उपस्थित सभासद, महिला व ज्येष्ठ नागरिकांचे आभार मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी समता पतसंस्थेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाने विशेष परिश्रम घेतले.

# वृक्षारोपण एक दिवसाचे, संवर्धन पाच वर्षांचे

## निरंकारी मिशनचा अनोखा संकल्प

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : निसर्गासोबत समरसता साधत केवळ वृक्षलागवड न करता त्यांच्या संवर्धनावर भर देण्याचा संकल्प संत निरंकारी मिशनने केला आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये सुरू झालेल्या या अभियानाला आता देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले आहे. अभियानाच्या सहाव्या टप्प्याला रविवार (दि. २३ ऑगस्ट) रोजी सुरुवात झाली. देशातील ग्रामीण व शहरी भागातील ६३० ठिकाणी एकाच वेळी सुमारे दहा लाख रोपांची लागवड करण्यात आली.

देशभरातील ३५० हून अधिक ठिकाणी निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक वृक्षांची नियमित निगा राखत आहेत. वृक्षारोपणाचा उत्सव एक दिवसाचा, मात्र संवर्धनाची जबाबदारी तीन ते पाच वर्षांची, अशी या अभियानाची भूमिका असल्याची माहिती मिशनचे सचिव जोगिंदर सुखीजा यांनी दिली. श्रीरामपूर येथील न्यायालयाच्या आवारातही निरंकारी मिशनतर्फे वृक्षारोपण करण्यात आले.

दिवाणी न्यायाधीश ए. बी. मरलेचा, एस. जी. सरोदे आणि सहकार न्यायाधीश एस. व्ही. पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ झाला. सेवादल युनिट क्रमांक २५५ चे संचालक श्याम वधवा यांच्यासह युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. प्रसन्न बिंगी यांच्या विशेष प्रयत्नातून वृक्षारोपणास परवानगी मिळाली. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संत निरंकारी मिशनचे श्रीरामपूर शाखेचे मुखी राजकुमार माटा यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला.

# विद्यार्थ्यांनी बनविलेल्या गणेशमूर्तीचीच घरी स्थापना करा : महापौर

## शाडू मातीपासून विद्यार्थ्यांनी साकारले गणराय

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** महानगरपालिका व रेसिडेन्सी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली.

या कार्यशाळेत रेसिडेन्सी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मनोभावे शाडू मातीला आकार देत श्री गणेशाच्या विविध रूपांतील सुंदर मूर्ती साकारल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत गणेशमूर्ती बनविण्याचा आनंद घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणपतीची स्थापना तसेच पारंपरिक पद्धतीने काढण्यात येणारी गणेशमूर्तीची मिरवणूक याबाबत जनजागृतीपर कला सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, विद्यालयाचे प्राचार्य विजय जाधव, उपप्राचार्य भाऊसाहेब पवार, पर्यावरणप्रेमी सुरेश खामकर, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, तुकाराम भांगरे, मूर्तिकार बालाजी बल्लाळ, पर्यवेक्षक शरद सोनवणे, वैशाली मरकड, धनंजय मस्के, भरतसिंग सारवान आदींसह विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, अहिल्यानगरकरांचा आवडता उत्सव म्हणजे गणेशोत्सव होय. विद्यार्थ्यांनी नवीन गणपतीची मूर्ती विकत न घेता आपल्या हाताने शाडू मातीला आकार देऊन भक्ती व श्रद्धेने तयार केलेल्या गणेशमूर्तीची पारंपरिक पद्धतीने घरी स्थापना करावी.

स्वच्छ, सुंदर व हरित अहिल्यानगर बनविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्याचे काम होणार आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व समाजाला पटवून देण्याबरोबरच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम व हानी याची माहिती विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना मिळेल. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याचे पर्यावरणाच्या दृष्टीने अनेक फायदे असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, अहिल्यानगर शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. शाडू मातीच्या गणेशमूर्तीचा मोठ्या प्रमाणात वापर करावा, जेणेकरून प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना पर्याय उपलब्ध होईल आणि त्यामुळे होणारे जलप्रदूषण टाळता येईल.

# राजकीय सूड भावनेतून आम्हाला अपात्र केले

## मात्र आता प्रभागातील नागरिकांवर देखील अन्याय : भैलुमे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

> प्रभागातील दलित वस्तीचा निधी हा नागरिकांच्या हक्काचा आहे. नगरसेवक अपात्र ठरला तरी नागरिकांचे अधिकार हिरावून घेता येत नाहीत. प्रशासनाने तातडीने ३० लाखांचा निधी वर्ग करून कामांचे आदेश न काढल्यास, नगरपंचायतीवर तीव्र आंदोलन करुन कार्यालयाला 'टाळे ठोक आंदोलन' छेडले जाईल.
>
> **– भास्कर भैलुमे**

**कर्जत :** आम्हाला राजकीय सूड भावनेतून अपात्र केलेच पण आता नगरपंचायत प्रशासन देखील आमच्या प्रभागातील नागरिकांशी सूड उगवत असून आपण हे कदापी सहन करणार नाही. प्रभाग क्रमांक १५ मधील अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मंजूर झालेला तब्बल ३० लाख रुपयांचा विकासनिधी रोखून धरल्याचे नगरसेवक भास्कर भैलुमे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हंटले आहे. नगरपंचायतीने आपल्या वागणुकीत सुधारणा न केल्यास टाळे ठोकण्याचा इशारा निवेदनात दिला.

महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती अधिनियमातील कलम ३१३ (किंवा कलम ४५२) मधील कायदेशीर तरतुदींनुसार, एखाद्या प्रभागाचा नगरसेवक अपात्र ठरल्यास त्या प्रभागातील नागरी सुविधा आणि प्रशासकीय कारभाराची संपूर्ण जबाबदारी ही नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांची असते. मात्र मुख्याधिकारी कर्जत या जबाबदारीपासून पळ काढीत असून या भागातील नगरसेवक अपात्र झाला आहे त्या प्रभागात निधी द्यायचा नाही असे सत्ताधारी पदाधिकाऱ्याच्या सांगण्यावरून मंजूर झालेला निधी रोखण्याचे बेकायदेशीर काम सध्या सुरू आहे. वास्तविक पाहता प्रभाग क्रमांक १५ मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजनेत प्रभागातील अंतर्गत रस्त्यांवर प्रकाश व्यवस्थेसाठी १५ लाख तर भवानी नगर, सिद्धार्थ नगर व कुरेशी नगरमधील प्रमुख रस्त्यांचे काँक्रिटीकरणासाठी १५ लाख रुपयांची रीतसर मागणी केली होती. हा निधी कोणत्या नेत्याचा किवा कोणत्या पदाधिकारी यांनी दिलेला नसुन तो अनुसूचित जाती साठी राखीव असलेल्या प्रभागाच्या जनतेचा हक्काचा निधी आहे याचे भान पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांना नसावे ही शोकांतिका म्हणावी लागेल. भारतीय संविधानातील कलम ४६ आणि अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना मार्गदर्शक तत्त्वांनुसार दलित वस्तीसाठी रस्ते, वीज आणि स्वच्छता यांसारख्या सुविधा पुरवणे हे प्रशासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे.

## द • ख • ल

### माळेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील माळेगाव येथे श्रावण मासानिमित्त सालाबाद प्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन दि. २४ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट पर्यंत पाच ते आठ काकड आरती ७ ते ८ विष्णुसहस्रनाम ९ ते ११ शिवलीलामृत पारायण ४ ते ५ ओम नमः शिवाय जप ५ ते ६ हरिपाठ ७ ते ९ हरिकीर्तन सुदर्शन महाराज बोडखे, बाळकृष्ण महाराज रिंधे, माऊली महाराज शास्त्री, लक्ष्मण महाराज खरात, रेणुकाताई महाराज पाखरे, उद्धव महाराज सबलस, श्रीकांत महाराज सारडा यांच्या अमृततुल्य वाणीतून हरिकीर्तनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे३१ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजता महादेव पार्वती चा अभिषेक होईल त्यानंतर सकाळी ८ ते ९ मिरवणूक त्यानंतर१०ते१२या वेळेत ह भ प पांडुरंग महाराज झुंबड मठाधिपती श्री क्षेत्र तोंडोळी यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाची पंगत अमोल थोरात ,दादासाहेब पोकळे ,ज्ञानेश्वर येवले ,विष्णू लांडे यांची होईल. या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान पंचकमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी मराठी माध्यमातून शिक्षणाचा पाया मजबूत करा : महापौर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** प्राथमिक शिक्षण हे मुलांच्या उज्वल भविष्याचा भक्कम पाया असते. याच टप्प्यावर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त, आत्मविश्वास आणि विविध गुण विकसित होत असतात. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असली, तरी मातृभाषेतूनही विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता येते. आज विविध क्षेत्रांत मोठ्या पदांवर कार्यरत असलेले अनेक अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्ती मराठी माध्यमातूनच घडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांनी राज्य सरकारच्या मोफत शिक्षणाच्या सुविधेचा लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी शाळा व शिक्षकांना सहकार्य करावे; मात्र मुलांवर अपेक्षांचे अनावश्यक ओझे लादू नये, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयात पालक–शिक्षक सहविचार सभा उत्साहात पार पडली. यावेळी इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात महापौर ज्योतीताई गाडे बोलत होत्या.

यावेळी ज्ञानदेव पांडुळे, शामराव व्यवहारे, कैलास लोंढे, नंदाताई पांडुळे, इमरान तांबोळी, लक्ष्मीताई आहेर, महादेव भद्रे यांच्यासह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी लक्ष्मीबाई व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांनी पालक–शिक्षक सहविचार सभेत पालकांशी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीपासून ते पोषण आहार, आरोग्य, आहाराच्या सवयी तसेच विविध परीक्षांची तयारी या विषयांवर संवाद साधला.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** 'माय भारत' आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २७ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांशी आभासी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर आणि संगमनेर नगरपालिका कला, दा. ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर या दोन निवडक महाविद्यालयांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात संबंधित महाविद्यालयांतील विद्यार्थी, एनएसएस स्वयंसेवक आणि तरुणांसह राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू सहभागी होणार आहेत. पंतप्रधानांशी आभासी संवाद साधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार असून, खेळ, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, आरोग्यदायी जीवनशैली आणि सक्रिय सहभागाचे महत्त्व याबाबत तरुणांना मार्गदर्शन मिळणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना यशस्वी खेळाडूंच्या अनुभवातून प्रेरणा घेता येणार आहे. क्रीडा क्षेत्रातील समर्पण, शिस्त, चिकाटी, तंदुरुस्ती आणि उत्कृष्टतेचे महत्त्वही त्यांना समजून घेता येणार आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने माय भारत आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या स्वयंसेवकांना तरुणांमध्ये खेळ, तंदुरुस्ती आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

# आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त सामान्यज्ञान परीक्षा; ४२५ विद्यार्थ्यांचा सहभाग

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**पाथर्डी शहर :** पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वाढदिवसानिमित्त बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सामान्यज्ञान परीक्षा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या परीक्षेत तब्बल ४२५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये सामान्यज्ञानाची आवड निर्माण व्हावी, विविध स्पर्धात्मक परीक्षांविषयी जाणीव निर्माण होऊन त्यांची पूर्वतयारी व्हावी, तसेच व्यापक शैक्षणिक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने 'सामान्यज्ञान परीक्षा २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसाच्या निमित्ताने शैक्षणिक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीला हातभार लावण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर देण्यात येत आहे. सामान्यज्ञान परीक्षेसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना चालू घडामोडी, इतिहास, भूगोल, विज्ञान, भारतीय राज्यघटना, क्रीडा, साहित्य आदी विविध ज्ञानशाखांची ओळख होण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक सलीम शेख व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने या परीक्षेचे आयोजन केले. परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता अकरावीमधून राठोड अश्विनी हिने प्रथम, गव्हाणे सार्थक याने द्वितीय तर शेख कौसर हिने तृतीय क्रमांक पटकाविला. इयत्ता बारावीमधून खेडकर नियती हिने प्रथम, शिंदे विठ्ठल याने द्वितीय तर दिवटे गायत्री हिने तृतीय क्रमांक मिळविला.

# केडगावात साई सच्चरित्र पारायणास भक्तिमय वातावरणात प्रारंभ



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा शुभारंभ सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी राजू सातपुते यांच्या हस्ते श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे विधिवत पूजन करून भक्तिमय वातावरणात करण्यात आला. यावेळी श्री साई सच्चरित्र ग्रंथाचे पारायण वाचन श्रीनिवास सहदेव, राहुरी यांच्या वाणीतून होणार आहे. पारायणाच्या निमित्ताने मंदिर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मोठ्या संख्येने साईभक्त पारायणात सहभागी होत आहेत.

श्री साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन विविध धार्मिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यामध्ये काकड आरती, दुग्धाभिषेक, महापूजा यांसह विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सामाजिक बांधिलकी जपत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

वर्धापन दिनानिमित्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक धडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचालित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने समर्थ गुरुकुल, बेल्हे येथील इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी अर्डीनो वर आधारित तंत्रज्ञानविषयक प्रात्यक्षिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक्स, प्रोग्रामिंग, सेन्सर आणि स्वयंचलित प्रणालींचा प्रत्यक्ष अनुभव घेत आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून घेतली.

कार्यशाळेत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागातील विद्यार्थी यश गुंजाळ, वेद कढणे आणि सार्थक देशमुख यांनी गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना अर्डीनो प्रोसेसरची मूलभूत माहिती, प्रोग्रामिंग तसेच विविध इलेक्ट्रॉनिक घटकांचे अर्डीनो सोबत इंटरफेसिंग याबाबत मार्गदर्शन केले. केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करून शिकण्याची संधी देण्यात आली.यावेळी एलईडी इंटरफेसिंग व प्रकाश सिग्नल प्रणाली, एलसीडी डिस्प्ले, तापमान मापन, आर्द्रता मापन आणि सर्वो मोटर नियंत्रण यांसारख्या विविध प्रकल्पांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. विविध सेन्सरच्या माध्यमातून तापमान व आर्द्रतेची माहिती मिळविणे, ती एलसीडी डिस्प्लेवर प्रदर्शित करणे तसेच सर्वो मोटरच्या साहाय्याने उपकरणांच्या हालचाली नियंत्रित करणे याचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नवनाथ नरवडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमुनिकेशन इंजीनियरिंग विभागप्रमुख प्रा. निर्मल कोठारी आणि प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ शरद पारखे, यांनी या उपक्रमाचे आयोजक प्रा. सुचिता साबळे, प्रा.प्रियांका लोखंडे तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# दुसऱ्या श्रावण सोमवारी हरिहरेश्वर महादेव मंदिरात 'अघोरी महाकाल'चा थाटात शृंगार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** बागरोजा हडको, दिल्ली गेट येथील श्री हरिहरेश्वर महादेव मंदिरात हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या वतीने नित्य सोमवार महाआरतीचा ५२ वा सोहळा तसेच दुसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त भगवान महादेवांचा 'अघोरी महाकाल' स्वरूपातील विशेष शृंगार भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

श्रावण महिन्यात भगवान महादेवाच्या दर्शनाला विशेष महत्त्व असल्याने मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची वर्दळ वाढली होती. 'अघोरी महाकाल' स्वरूपातील आकर्षक शृंगार भाविकांचे विशेष आकर्षण ठरला. या शृंगाराचे दर्शन घेण्यासाठी अहिल्यानगर शहरातील तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने मंदिरात उपस्थिती लावली. महाआरतीच्या वेळी मंदिर परिसर हर हर महादेव, बम बम भोलेच्या जयघोषाने दुमदुमून गेला. भक्तिमय वातावरणात विधिवत महाआरती करण्यात आली. महादेवाच्या दर्शनानंतर भाविकांनी मोठ्या श्रद्धेने पूजा–अर्चना करून आशीर्वाद घेतला. विशेष शृंगारामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष नियोजन केले. महाप्रसादाचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घेतला.

हरिहरेश्वर मित्र मंडळ (ट्रस्ट)च्या कार्यकर्त्यांनी श्रावण सोमवारनिमित्त केलेल्या विशेष नियोजनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# रुग्णसेवेसाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल विश्वास व श्रद्धेचे केंद्र : पितळे

## आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत अस्थिरोग तपासणी शिबिर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** रुग्णसेवेसाठी विश्वास व श्रद्धेचे केंद्र म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलने नावलौकिक मिळवला आहे. प.पू. आनंदऋषीजी महाराजांच्या मानवसेवेच्या कार्याची पायाभरणी प.पू. आदर्शऋषीजी यांनी या हॉस्पिटलच्या उभारणीतून केली. जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य समर्पित भावनेने या कार्यात योगदान देत आहेत. रुग्णसेवेचे रोपटे आता वटवृक्षात बहरले असून, अनेक गरजू कुटुंबांना या सेवेच्या सावलीचा आधार मिळाला आहे, अशी भावना सीए अशोक पितळे यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटल एड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त सीए अशोक धनराज पितळे परिवाराच्या वतीने मोफत अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया तसेच फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सीए अशोक पितळे बोलत होते. यावेळी सौ. निता पितळे, मनीष पितळे, सीए गौरव पितळे, आनंद पितळे, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, माणकचंद कटारिया, वसंत चोपडा, तज्ज्ञ डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाइन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. भरत जगताप, डॉ. नितीन कुमार, डॉ. अभय साठे, डॉ. आराधना अखडे आदी उपस्थित होते.

पुढे सीए पितळे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात उद्योग–व्यवसाय सांभाळून अनेक कुटुंबे समर्पित भावनेने रुग्णसेवेशी जोडली गेली आहेत. त्यांची पुढील पिढीदेखील या कार्यात योगदान देत आहे. गरिबांना कमी खर्चात उपचार मिळावेत, हा रुग्णसेवेचा मापदंड घेऊन हॉस्पिटलमध्ये कार्य केले जात आहे. हॉस्पिटलच्या नेत्रालयाने राज्यात सर्वाधिक यशस्वी शस्त्रक्रिया करण्याचा मान मिळवला आहे. उपनगरातील नागरिकांसाठी तारकपूर येथेही सेंटर सुरू करण्यात आले असून, त्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, शेवटच्या घटकेपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी ही सेवा सुरू झाली आहे. प्रत्येक सदस्य सद्भावनेने या कार्यात सहभाग देत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत. रुग्णसेवेचे प.पू. आदर्शऋषीजींचे स्वप्न या हॉस्पिटलच्या माध्यमातून साकारले गेले आहे. मानवसेवेचा विडा उचलून रुग्णसेवा मनोभावे केली जात आहे. यावर्षी नवीन प्रकल्प म्हणून अद्ययावत रोबोटिक सर्जरी उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. कमी खर्चात अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. एमआरआय व इतर तपासण्याही रुग्णांना अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशोक पितळे हे नामवंत सीए असून, त्यांचा परिवार हॉस्पिटलच्या सेवाकार्याशी जोडला गेलेला आहे. मुंबई येथे झालेल्या कॉन्फरन्समध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्र विभागाची प्रामुख्याने दखल घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी हॉस्पिटलच्या विविध सुरू असलेल्या प्रकल्पांचीही माहिती त्यांनी दिली.

डॉ. विशाल शिंदे यांनी गुडघा प्रत्यारोपण व खुबा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची माहिती दिली. गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. गोठलेला खांदा, मानदुखी व पाठदुखी याबाबतही उपचारांची माहिती त्यांनी दिली.

डॉ. नितीन कुमार यांनी सर्जरीनंतर शरीराची ताकद कमी होते. मात्र फिजिओथेरपीच्या माध्यमातून पूर्वीप्रमाणे शरीराच्या हालचाली करण्यासाठी सूक्ष्म व्यायाम पद्धती हॉस्पिटलमध्ये दिली जाते, असे सांगितले. योग्य व्यायामामुळे त्या हालचालींसाठी मेंदू सकारात्मक प्रतिसाद देतो. रुग्णांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कामही केले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मोफत शिबिरात एकूण १३५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी अस्थिरोग, मणके व सांधेदुखीबाबत रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरामुळे गरजू रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला तसेच पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन देण्यात आले.

# पावसाअभावी खरिपाची पिके करपू लागली

## शेवगाव तालुक्यात अनेक गावात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** चालू हंगामाचा पावसाळ्याचा जून, जुलै व ऑगस्ट महिना संपत आला असून सुद्धा शेवगाव तालुक्यात अजूनही नद्या, नाले व ओढे वाहून जाण्याइतक्या पावसाने हजेरी न लावल्याने तालुक्यातील खरिपाची पेरणी अगर लागवड झालेले संपूर्ण पिके करपू लागली असून धोक्यात सापडली असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.विस्ताराने मोठ्या असलेल्या तालुक्यात मोठ - मोठी जमिनीचे क्षेत्र असणारे असंख्य गावे असून शेतकऱ्यांचं पांढर सोन म्हणून संबोधल्या जाणाऱ्या कपासी पिकाची भरमसाठपणे पेरणी व लागवड झाली असून जिल्ह्यात सर्वात कापसाचे उत्पादन मिळवुन



देणारा तालुका म्हणून जिल्ह्यात शेवगावची ओळख निर्माण झाली आहे. कारण कापसाचे उत्पादन झाल्यानंतर परराज्यातून अनेक व्यापारी येऊन शेवगावचा कापूस खरेदी करत असतात त्याचे कारणही असे आहे ते म्हणजे तालुक्यात उत्पादित झालेला कापूस हा उत्तम दर्जाचा असून त्याला मोठ्या प्रमाणात व्यापारी वर्गाची खरेदी करण्यासाठी पसंती असल्याचेही आजपर्यंत दिसून आलेले आहे. कपाशी नंतर तूर पिकाचीही त्या खालोखाल पेरणी अगर लागवड झाली असून खरिपाच्या इतर पिकांच्याही पेरण्या झाल्या असल्या तरी तालुक्यात सर्वच ठिकाणी जोमाने आलेले पीक पावसाअभावी करपू लागल्याने धोक्यात आले असल्याचे चित्र दिसून येत आहे.ग्रामीण भागात शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत असताना उसनवार

**त्यातच रासायनिक खताचे भाव गगनाला भिडले असल्यामुळे शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले असून शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय करावा की नाही या चिंतेत असंख्य शेतकरी असल्याचेही दिसून येत आहे.**

करून मोलमहागाईचे बी - बियाणे, खते व औषधे खरेदी करून बसलेल्या शेतकऱ्यांपुढे मोठे आवाहन उभे राहिले असल्याचेही दिसून्येत आहे. शेती - सिचनाबरोबरच तालुक्यातील अनेक गावातील विहिरींनी तळ ठोकले असल्यामुळे थोड्याच दिवसात पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावली नाही तर त्या ठिकाणचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनण्याची चिन्हे दिसून येत असल्याने त्या ठिकाणी नव्याने टँकर सुरू करण्याशिवाय प्रशासनापुढे दुसरा पर्याय नाही. कारण आजच तालुक्यातील १८ गावात १४ टँकरने पाणी पुरवठा सुरू असून भविष्यात त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातच गेल्या महिन्यात नाशिकला झालेल्या दमदार पावसामुळे पैठण येथील नाथसागर जलाशय जवळपास ९५ टक्के भरले असल्याने व पाऊस येईल या आशेने जलाशयाच्या उजव्या कालव्यात पाणी सोडून ते पाणी १३२ की मी अंतराने असलेल्या माजलगाव येथील धरणात नेऊन सोडले असल्यामुळे तालुक्यातील किमान १५ ते २० गावांना त्याचा मोठा दिलासा मिळाला असून या गावातील पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न या सुटलेल्या पाण्यामुळे सध्या तरी सुटला असल्याचे दिसून येत आहे.

# आगारातील नवीन बसेस हलविण्यावरून संताप

## पाचपैकी दोन बसेस रवाना, मनसे व प्रवासी संघटना आक्रमक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** पाथर्डी आगाराला नुकत्याच प्राप्त झालेल्या पाच नवीन 'राजमाता जिजाऊ' लेलँड कंपनीच्या बसेसपैकी दोन बसेस आगारातून अन्यत्र हलविण्यात आल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि पाथर्डी तालुका प्रवासी संघटना आक्रमक झाली आहे. उर्वरित तीन नवीन बसेसही अन्यत्र हलविण्याची शक्यता व्यक्त होत असून, या विरोधात मनसे व प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आगार प्रमुखांच्या दालनात आंदोलन करून प्रशासनाला तीव्र इशारा दिला.

पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण रस्ते, डोंगराळ भाग आणि घाटमाथ्याची परिस्थिती लक्षात घेता लेलँड कंपनीच्या बसेस अधिक मजबूत व टिकाऊ असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. यापूर्वी आगारात टाटा कंपनीच्या बसेस मोठ्या प्रमाणावर होत्या; मात्र ग्रामीण भागातील रस्त्यांची परिस्थिती आणि



विविध घाटमार्गांमुळे या बसेसच्या देखभालीचा प्रश्न वारंवार निर्माण होत असल्याचे मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी यावेळी सांगितले. पाथर्डीच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता लेलँड कंपनीच्या बसेस येथील मार्गांसाठी अधिक सक्षम आहेत. नव्याने मिळालेल्या पाच बसेसपैकी दोन बसेस आधीच हलविण्यात आल्या आहेत. आता उर्वरित बसेसही आगारातून बाहेर जाऊ देणार नाही, असा इशारा पालवे यांनी दिला. प्रवाशांना नियमित, सुरक्षित व सक्षम बससेवा मिळण्यासाठी पाथर्डी आगारात पुरेशा संख्येने नवीन बसेस उपलब्ध असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. नवीन बसेस पाथर्डी आगारात दाखल झाल्यानंतर त्याचे श्रेय घेण्यासाठी विविध राजकीय स्तरांवर दावे करण्यात आले होते. मात्र आता पाचपैकी दोन बसेस आगारातून हलविण्यात आल्यानंतर संबंधित लोकप्रतिनिधींनी प्रवाशांच्या हितासाठी हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा पालवे यांनी व्यक्त केली. या आंदोलनात अविनाश पालवे, संतोष जिरेसाळ, संदीप काकडे, गोरख जायभाय यांच्यासह मनसेचे पदाधिकारी तसेच पाथर्डी तालुका प्रवासी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**द•ख•ल**

## शिवबा संघटनेची पारनेर तालुका कार्यकारिणी बरखास्त

**निघोज :** समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी गेल्या १७ ते १८ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करणाऱ्या शिवबा संघटनेच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम, आंदोलने आणि जनहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत. या प्रवासात अनेक तरुणांना संघटनेच्या माध्यमातून विविध पदांवर काम करण्याची संधी देण्यात आली. संघटनेच्या कामाला नव्या जोमाने आणि नव्या दिशेने पुढे नेण्यासाठी शिवबा संघटनेची केवळ पारनेर तालुक्यातील जुनी कार्यकारिणी बरखास्त करण्यात येत असून, लवकरच नवीन तालुका कार्यकारिणी गठित करण्यात येणार आहे. नवीन कार्यकारिणीमध्ये सामाजिक कार्याची आवड असलेले, समाजाच्या प्रश्नांसाठी काम करण्याची जिद्द असलेले, सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पुढाकार घेणारे आणि संघटनात्मक काम करण्याची क्षमता असलेल्या नव्या तरुणांना संधी दिली जाणार आहे. नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करताना संघटनेच्या नेतृत्वाकडून इच्छुक कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. त्यानंतर सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, संघटन कौशल्य आणि प्रत्यक्ष समाजकार्यात योगदान देण्याची तयारी यांचा विचार करून योग्य कार्यकर्त्यांना जबाबदारी सोपविण्यात येणार आहे.

# जवानांसाठी राखी उपक्रमात विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग

## श्री भवानी माता विद्यालयात पर्यावरणपूरक राखी बनविण्याची कार्यशाळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीमानूर :** देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावत देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व प्रेम व्यक्त करण्यासाठी भारतीय डाक विभागामार्फत 'जवानांसाठी राखी' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर येथे विद्यार्थिनींसाठी राखी बनविण्याची विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या. स्वतःच्या हाताने तयार



केलेल्या या राख्या देशाच्या सीमेवर तैनात जवानांपर्यंत पाठविण्यात येणार असून, त्यातून जवानांप्रती आदर, कृतज्ञता आणि देशप्रेमाची भावना व्यक्त होणार आहे.

राखी बनविण्यासाठी निलेश गणगले, रुपाली पांढरे, प्रविण गावडे व शाम गुंजकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. तसेच हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पोस्ट मास्टर आघाव ज्ञानेश्वरी व श्दीपक कातकडे यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्राचार्य देविदास सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच देशसेवेची भावना, जवानांप्रती कृतज्ञता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे रुजविण्यात आला.

# रसाळ कुटुंबातील बहीण-भावाचे एम.पी.एस.सी मधील दैदिप्यमान यश



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** एकाच कुटुंबातील दोन अपत्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, कोणताही क्लास न लावता, केवळ स्व-अभ्यासाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांमध्ये उत्तम यश मिळवणे ही एक अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद गोष्ट आहे. रसाळ कुटुंबातील नवनाथ सरसाबाई आनंदा रसाळ आणि ऋतुजा अंजनाबाई संपत रसाळ या बहीण-भावाने हा ऐतिहासिक पराक्रम करून दाखवला आहे.प्रतिकूल परिस्थिती आणि आई-वडिलांचा अढळ विश्वास या प्रवासाची पार्श्वभूमी अत्यंत खडतर आहे.

आई-वडील अशिक्षित; ज्यांना MPSC म्हणजे काय, या परीक्षेचे स्वरूप कसे असते किंवा या पदांची प्रतिष्ठा काय असते, याची काहीही कल्पना नव्हती. परंतु, आपली मुले प्रामाणिकपणे अभ्यास करत आहेत आणि ते योग्य मार्गावर आहेत, यावर त्यांचा अंध नसून अथांग विश्वास होता. मुलांच्या शिक्षणासाठी आणि स्वप्नांसाठी आई-वडिलांनी अतोनात कष्ट उपसले, हाल-अपेष्टा सहन केल्या, पण मुलांच्या अभ्यासात कोणतीही उणीव भासू दिली नाही.

# अण्णाभाऊ साठे नगरात ड्रेनेज सफाईला सुरुवात!

**ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगरातील ड्रेनेज लाइन चोकअप, साचलेले पाणी, दुर्गंधी व घाणीच्या साम्राज्याबाबत डिजिटल तसेच प्रिंट मीडियातून वृत्त प्रसिद्ध होताच राशीन ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी तथा प्रशासक रोहिदास कापरे यांनी तातडीने दखल घेतली. यंत्रसामग्रीच्या सहाय्याने ड्रेनेज लाइन साफ करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

प्रशासक रोहिदास कापरे यांनी घटनास्थळी भेट देऊन संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. तसेच नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवावा, ग्रामपंचायतीकडून वेळोवेळी आवश्यक सहकार्य केले जाईल, असे सांगितले. जुना कुंभारगाव रोड व मुख्य बाजारपेठेतील स्वच्छतेचे कामही लवकरच हाती घेण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

दरम्यान, नागरिकांच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी राशीन ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अशोक जंजिरे, अमोल जाधव, महेश




उकिरडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना तसेच माध्यमांच्या वृत्तांकनाला यश मिळाले असून ड्रेनेज सफाईचे काम सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# काकडेंना समाजभूषण तर डॉ.घनवट यांना आरोग्य रत्न पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** राज्य शिवराय प्रतिस्थान महाराष्ट्र राज्य व राज्य शिवराय बहुउद्देशीय फाउंडेशन आयोजित पुणे सांस्कृतिक महोत्सव २०२६ चा राज्यस्तरीय पुरस्कार शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नितीन काकडे यांना समाजभूषण तर डॉ प्रकाश घनवट यांना आरोग्यरत्न गौरव पुरस्कार नुकताच जाहीर झाला असून त्याचा वितरण सोहळा शुक्रवार रोजी पुणे शहरातील बिबवेवाडी येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृहात कोल्हापूर संस्थानचे छत्रपती संभाजी राजे महाराज, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, महसूल



मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री माधुरीताई मिसाळ, पुणे महानगर पालिकेच्या महापौर मंजुषाताई नागपुरे, आदीसह इतरही मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी सदरचा कार्यक्रम पार पडणार असल्याबाबतची माहिती राजे शिवराय प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य व राज्य शिवराय बहुउद्देशीय फाउंडेशनचे संस्थापक ,सचिव किरण घोरतळे यांनी दिली आहे. सदरचे पुरस्कार हे वेग - वेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना प्रत्येक वर्षी दिले जात असल्याचेही या वेळी सांगण्यात आले.

# युवकांच्या पाठीवर थाप, गावाने केलेला सत्कार लाखमोलाचा : आ. दाते




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भाळवणी :** युवकांच्या पाठीवर थाप मारण्यासाठी गावाने केलेला सत्कार लाखमोलाचा असून सातत्याने प्रयत्न केले तर निश्चितपणे यश मिळवता येते असे प्रतिपादन आ. काशीनाथ दाते यांनी केले. भाळवणी येथील शेतकरी दाम्पत्य आशा व अर्जून चेमटे यांचा मुलगा अमोल याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत दुय्यम निबंधक (वर्ग १) या परिक्षेत राज्यात सहावा क्रमांक पटकावला तर विक्रीकर निरिक्षक पदासाठी राज्यात पाचवा क्रमांक पटकावला असुन या यशाबद्दल त्याचा ग्रामस्थ, नातेवाईक व स्पंदन प्रतिष्ठान तर्फे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी आ. दाते बोलत होते. यावेळी अमोल याची त्याच्या आई - वडिलांसोबत सजवलेल्या बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी संभाजीर रोहकले, लीलाबाई रोहोकले, संदीप रोहोकले, संभाजीराव आमले, प्रशांत गायकवाड, संदीप ठुबे, बाबूशेठ रोहोकले, बबनराव भुजबळ, आबासाहेब चेमटे, शिवाजी पटेकर, गंगाधर रोहोकले, प्रा. बबनराव भुजबळ, विजय कुलथे, जावेद शेख, अविनाश राऊत, मंगेश काळे, उपसरपंच अप्पादादा रोहकले, झुंबर रोहोकले, नामदेव रोहोकले, मंजाबापू चेमटे, ज्ञानदेव रोहोकले, बबनराव चेमटे, राहुल बांडे, प्रकाश रोहोकले, संतोष रोहोकले, अमोलचे मामा व मार्गदर्शक प्रा. रेवणनाथ रोहोकले, अमोलचे सहकारी मित्र, नातेवाईक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुक्यातील विजेचा खेळखंडोबा कधी थांबणार?

## शेतकऱ्यांची आर्त हाक; पिकांना पाणी देण्यासाठी वीज हवी

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा : तालुक्यातील ग्रामीण भागात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. कधी दिवसा वीज गायब, तर कधी रात्री वीज येते आणि काही वेळातच पुन्हा खंडित होते, अशा परिस्थितीत शेतीचे नियोजन करायचे तरी कसे, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. पिकांना पाणी देण्याची वेळ निघून जाते; मात्र महावितरणच्या विजेचा 'खेळखंडोबा' संपण्याचे नाव घेत नाही.**

पावसाची अनिश्चितता, पिकांवरील वाढता खर्च आणि त्यात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याची शेतकऱ्यांची भावना आहे.महावितरणच्या माहितीनुसार कृषी वीजवाहिन्यांद्वारे शेतीसाठी नियोजित वीजपुरवठा देण्याची व्यवस्था आहे; मात्र प्रत्यक्ष ग्रामीण भागात वारंवार होणारे बिघाड, कमी-जास्त दाब आणि अनियमित पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी आहेत.

वीज नाही तर पाणी नाही; पाणी नाही तर पीक नाही!

शेतकऱ्यांसाठी वीज म्हणजे केवळ दिवा पेटवण्याचे



### आश्वासनांचा 'लपंडाव' नको!

साधन नाही; ती त्यांच्या पिकांच्या जगण्याची नाडी आहे. विहीर, बोअरवेल किंवा शेततळ्यातील पाणी मोटारीने उचलण्यासाठी वीज आवश्यक आहे. मात्र वीजच वेळेवर मिळत नसेल, तर उपलब्ध पाणी असूनही शेतकरी ते पिकांपर्यंत पोहोचवू शकत नाही.

याचा थेट परिणाम पिकांच्या उत्पादनावर होत आहे. पिके हाताशी आलेली असताना वीजपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांच्या संपूर्ण वर्षाच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची भीती निर्माण होते.

**महावितरणने 'बिघाड' नव्हे, कायमस्वरूपी उपाय शोधावा**

वीज खंडित झाल्यानंतर दुरुस्ती पथक येते, काही वेळाने वीज सुरू होते आणि पुन्हा काही दिवसांनी तीच समस्या निर्माण होते. त्यामुळे केवळ तात्पुरती दुरुस्ती न करता जीर्ण वाहिन्या, रोहित्रे, फिडर आणि अन्य तांत्रिक अडचणींचे कायमस्वरूपी निराकरण करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध भागांत वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर शेतकरी आंदोलनाच्या भूमिकेत उतरल्याचे अलीकडील घटनांमधून दिसून येते. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातही प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

**शेतकऱ्यांचा सवाल साधा आहे वीजपुरवठा सुरळीत कधी होणार?**

आश्वासने, तात्पुरत्या दुरुस्त्या आणि पुन्हा तोच वीजपुरवठ्याचा लपंडाव, हे चक्र आता थांबण्याची गरज आहे. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तालुक्यातील फिडरनिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन वारंवार वीज खंडित होणाऱ्या भागांची स्वतंत्र यादी तयार करावी आणि त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.शेतकरी म्हणतात'आम्हाला सवलत नको, उपकार नकोत; आमच्या हक्काची वीज वेळेवर द्या. कारण वीज गेली की फक्त दिवा बंद होत नाही, आमच्या पिकांचा श्वास बंद होतो!'

# तेवीस वर्षांच्या नि:स्वार्थ शैक्षणिक सेवेला 'आदर्श प्राचार्य' पुरस्कार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** पुणे येथील ज्ञानदायीनी संस्थेच्या वतीने हशु आडवाणी विद्यालय, राशीनचे प्राचार्य राजेंद्र नष्टे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'आदर्श प्राचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. रविवार रोजी पुणे येथे हा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. भारत सरकारच्या युवा कल्याण व क्रीडा मंत्रालयाचे डेप्युटी डायरेक्टर यशवंत मानखेडकर यांच्या हस्ते राजेंद्र नष्टे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अश्विनी पाटील, सुदैव कुटुंब संस्थेचे अध्यक्ष, टीव्ही मालिका अभिनेत्री शर्मिला वांडेकर, सिने कलाकार सिद्धार्थ कुलकर्णी, यशस्वी उद्योजक व गीतकार मिलिंद डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते. राजेंद्र नष्टे यांनी हशु आडवाणी विद्यालयात तब्बल २३ वर्षे विना वेतन शैक्षणिक सेवा बजावत, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि विद्यालयाच्या प्रगतीसाठी सातत्याने योगदान दिले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.२६ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## टाकळीमिया येथे विहिरीत पडून वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील टाकळीमिया येथील फटांगरे वस्ती येथे ८१ वर्षीय वृद्धाचा विहिरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना काल मंगळवारी (दि.२५) सकाळी उघडकीस आली. काशिनाथ विश्वनाथ करपे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. काशिनाथ करपे यांचा मृतदेह विहिरीत आढळून आल्यानंतर त्यांच्या मृत्यूबाबत परिसरात विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत. घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी रवी देवगिरे यांच्या रुग्णवाहिकेतून राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. मयत काशिनाथ करपे यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# गुटख्याच्या टेम्पोचा सिनेस्टाईल पाठलाग

## ५१ लाखांचा मुद्देमाल पकडला | खर्डा पोलिसांची कामगिरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : तालुक्यातील खर्डा पोलिसांनी गुटख्याविरोधात मोठी कारवाई करत प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांसह आयशर टेम्पो असा तब्बल ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांनी संशयित आयशर टेम्पोला थांबण्याचा इशारा करूनही चालकाने वाहन न थांबविता भरधाव वेगाने पळवून नेल्याने पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून हे वाहन तेलंगशी गावच्या शिवारात ताब्यात घेतले. परंतु पोलीस पाहून तिघे जण पळून जाण्यात यशस्वी ठरले. या कारवाईमुळे गुटखा तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी उज्ज्वलसिंह राजपूत व सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एका आयशर टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करण्यात येणार आहे.

सदर वाहन धाराशिवकडून बीडच्या दिशेने शिर्डी-हैदराबाद राज्य महामार्गाने जाणार आहे. या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी जातेगाव फाटा, खर्डा येथे नाकाबंदी केली. त्यावेळी संशयित आयशर टेम्पो भरधाव वेगाने येताना पोलिसांना दिसला. पोलिसांनी वाहन चालकास हात करून थांबण्याचा इशारा केला.

मात्र चालकाने वाहन न थांबविता सुसाट वेगाने बीडच्या दिशेने पळवून नेण्यास सुरुवात केली. संशयित वाहन पळून जात असल्याचे लक्षात येताच खर्डा पोलिसांच्या पथकाने तत्परता दाखवत वाहनाचा पाठलाग सुरू केला. काही अंतर पाठलाग केल्यानंतर पोलिसांनी सिनेस्टाईल पद्धतीने कारवाई करत सदर आयशर टेम्पो तेलंगशी गावच्या शिवारात ताब्यात घेतला.

यावेळी पोलिसांनी टेम्पोची झडती घेतली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ व सुगंधी सुपारी आढळून आली. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला. यावेळी प्रतिबंधित गुटखा व सुगंधी सुपारी अंदाजे किंमत ४१ लाख ४१ हजार ४८ रुपये आयशर टेम्पो अंदाजे किंमत १० लाख रुपये असा एकूण ५१ लाख ४१ हजार ४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी राजू मेहबूब शेख (रा. भेंडटाकळी, ता. गेवराई, जि. बीड), प्रदीप विष्णू गायकवाड (रा. च-हाटा फाटा, ता. जि. बीड) तसेच तुषार नामदेव कुसळकर (रा. बीड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पो. कॉ. शशिकांत म्हस्के यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुंमका, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गी, तसेच उपविभागीय अधिकारी सुजीतकुमार धीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहा. पो. नि. उज्ज्वलसिंह राजपूत, पो. उ. नि. अशोक खेडकर, पोलीस हवालदार संभाजी शेंडगे, गोकुळ इंगवले, रावसाहेब नागरगोजे, शशिकांत म्हस्के, वैजनाथ मिसाळ, बाळू खाडे, आनंद धनवडे, विष्णू आवारे, अशोक बडे, राहुल खेडकर, तसेच होमगार्ड तान्हाजी जायभाय, महादेव कदम, राहुल भिसे यांनी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक खेडकर करीत आहेत.

## राहुरी फॅक्टरी परिसरात दोन ठिकाणी घरफोडी

### सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अज्ञात भामट्यांनी दोन ठिकाणी धाडसी घरफोडी करून सोने चांदीचे दागीन्यासह रोख रक्कम व कपडे चोरुन नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी परिसरात दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील प्रसाद नगर येथे अतुल वंजारे हे कुटुंबासह राहतात. रात्रीच्या दरम्यान वंजारे कुटुंबीय घरात झोपलेले असताना अज्ञात भामट्यांनी घरात प्रवेश केला. वंजारे कुटुंबीय ज्या खोलीत झोपले होते, त्या खोलीच्या दरवाजाला बाहेरून कडी लावून भामट्यांनी शेजारील खोलीतील सामानाची उचकापाचक केली. आणि तेथील सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम घेऊन भामटे पसार झाले. याच दरम्यान राहुरी फॅक्टरी परिसरात असलेल्या गुरुकुल वसाहतमध्ये दुसरी एक घरफोडीची घटना घडली. सुभाष वाणी हे कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. या संधीचा फायदा घेऊन भामट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. दरम्यान घरातील सामानाची उचका पाचक करून साड्या व कपडे चोरून भामटे पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार प्रवीण बागुल यांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेतली. त्यानंतर अहिल्यानगर येथील ठसे तज्ज्ञांचे पथक व श्वान पथकाने घटनास्थळी हजर राहुन भामट्यांचा माग घेण्याचा प्रयत्न केला.

## एकरुखे येथील दरोडा प्रकरणी वारकऱ्यांच्या वेशातील आरोपचे चित्र प्रसारित

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहता पोलीस स्टेशन हद्दीत दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर नंबर ३४२/२०२६ मधील संशयित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून कसून तपास सुरू आहे. दरम्यान, हा गुन्हा घडत असताना राहता तालुक्यातील धनगरवाडी येथे गंगागिरी महाराज यांचा सप्ताह सुरू होता. या सप्ताहाच्या निमित्ताने अनेक भाविक व वारकरी सहभागी झाले होते.



याच गर्दीचा आणि सप्ताहाच्या वातावरणाचा फायदा घेत, कपाळाला गंध लावून आणि वारकऱ्यांसारखा पेहराव करून आलेल्या दरोडेखोरांनी या गुन्ह्यात सहभाग घेतल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या गुन्ह्यातील फिर्यादी महिलेस चाकूचा धाक दाखवून राहत्या घरात प्रवेश करून अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेण्यात आले, तर त्याच्या तीन साथीदारांनी घरात प्रवेश करून उचकापाचक करून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपीचे रेखाचित्र राहता पोलिसांनी तयार केले असून, पोलीस त्याआधारे आरोपींचा शोध घेत आहेत. सदर रेखाचित्रातील संशयित आरोपीबाबत कोणाला काही माहिती असल्यास किंवा तो कुठे दिसून आल्यास तात्काळ राहता पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

माहिती देण्यासाठी पोलीस निरीक्षक सरोदे ९८८११४८१८६ आणि सहायक पोलीस निरीक्षक गिरी ९५२७६२३१०० यावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी कळवले आहे.

## पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर सशस्त्र चोरट्यांचा धुमाकूळ

### घरफोडीने राहुरी हादरले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी पोलिस ठाण्यापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर आणि पंचायत समितीसमोरील घाडगे मळा परिसरात चार सशस्त्र चोरट्यांनी धाडसी घरफोडी केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास घडली. धारदार शस्त्रे हातात घेऊन आलेल्या चोरट्यांनी तब्बल पाऊण तास भरवस्तीत बिनधास्तपणे वावरत एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बंद बंगल्याचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मध्यरात्रीच्या सुमारास चार चोरटे घाडगे मळा परिसरात दाखल झाले. त्यांनी घरांची पाहणी सुरू केली. यावेळी आवाजाने एका नागरिकाला जाग आली. तो घराबाहेर येताच चोरट्यांनी धारदार शस्त्रांचा धाक दाखवून त्याला घरात जाण्यास भाग पाडले.

घाबरलेल्या नागरिकाने सकाळी हा प्रकार शेजाऱ्यांना सांगितला. दरम्यान, परिसरातील एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा बंगला बंद असल्याची संधी साधून चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडले. घरात प्रवेश करून कपाटांची उचकापाचक केली आणि साहित्य चोरून नेले. घरमालक बाहेरगावी असल्याने नेमका किती मुद्देमाल चोरीला गेला, याचा तपशील रात्री उशिरापर्यंत स्पष्ट झाला नव्हता.

> **चारही चोरटे सीसीटीव्हीत कैद**
>
> या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून त्यात चारही चोरटे स्पष्टपणे दिसत आहेत. त्यांच्या हातात धारदार हत्यारे असून त्यांनी हातमोजे घातल्याचेही फुटेजमध्ये दिसत आहे. त्यामुळे हे चोरटे सराईत असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिस ठाण्याचे सहाय्यक फौजदार तुळशीदास गीते व हवालदार ठाणगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले आहे. घरमालक परतल्यानंतर चोरीला गेलेल्या मुद्देमालाचा नेमका तपशील समोर येणार आहे. पोलिस ठाण्यापासून अगदी जवळच चार सशस्त्र चोरटे पाऊण तास बिनधास्तपणे वावरल्याने नागरिकांमध्ये पोलिसांच्या गस्तीसंदर्भात प्रश्न उपस्थित होत आहेत.

पोलिस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर झालेल्या या धाडसी घरफोडीमुळे 'चोरट्यांना कायद्याचा धाक राहिला आहे का?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## कान्हूर पठार- पारनेर मंडळातील शेतकऱ्यांसाठी दिलासा

### १३ कोटी ९ लाख ८८ हजार रुपयांच्या नुकसान भरपाईला शासनाची मंजुरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ जून ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळासह प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे झालेल्या पीक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर कान्हूर पठार व पारनेर सर्कलमधील बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १३ कोटी ९ लाख ८८ हजारांचा निधी मंजूर केला असून, या निर्णयामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शासन निर्णयातील तपशीलानुसार अहिल्यानगर जिल्ह्यासाठी १,३०९.८८ लाख रुपयांचा निधी निश्चित करण्यात आला आहे. या निधीच्या मंजुरीमागे पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला आहे. दि. २ जुलै रोजी मदत व पुनर्वसन विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती.

या बैठकीत आ. काशिनाथ दाते सरांच्या उपस्थितीत या शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी प्रस्ताव पुढे नेण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयाद्वारे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी निधी मंजूर केला आहे. जून २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी या निधीतून मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष मदत मिळवून देणे, हीच आपली भूमिका आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना या निधीचा योग्य लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल, असा विश्वासही आ. दाते सरांनी यावेळी व्यक्त केला. शासन निर्णयानुसार मंजूर निधी डीबीटी प्रणालीद्वारे पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असून कान्हूर पठार आणि पारनेर सर्कलमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी हा निधी संकटाच्या काळातील मोठा दिलासा ठरणार असल्याचे बोलले जात असून, आ. काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मिळालेले हे यश शेतकरी बांधवांसाठी समाधानाची बाब ठरली आहे.

## महसूल पथकाला पाहताच टिप्पर रिव्हर्स घेत वाळू माफियाचे पलायन

### ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर / झरेकाठी** : अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परवर कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकाला पाहताच चालकाने टिप्पर भरधाव रिव्हर्स घेत पळवून नेल्याची घटना संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द शिवारात घडली. अंधाराचा फायदा घेत चालक फरार झाला. या प्रकरणी आश्वी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सुमारे ७ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तहसीलदारांच्या आदेशानुसार तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीवर कारवाईसाठी विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत.

२३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वाअकराच्या सुमारास पिंपरणे मंडळ अधिकारी अमृत रामदास हिले हे सागर लांडे, रोपन गायकवाड व रविंद्र पानसरे यांच्यासह दाढ खुर्द परिसरात गस्तीवर होते. गुरुकृपा डेअरीजवळ पिवळ्या रंगाचा अशोक लेलँड टिप्पर संशयास्पदरीत्या येताना दिसला. पथकाने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता टिप्परचा क्रमांक खोडलेला असल्याचे निदर्शनास आले. तपासणी केली असता वाहनात सुमारे दोन ब्रास अवैध वाळू आढळली. चालक व मालक सागर गोरख जगताप (रा. कनोली, ता. संगमनेर) याने पथकाला न जुमानता टिप्पर भरधाव रिव्हर्स घेत दाढ खुर्दच्या दिशेने पळवून नेला. याप्रकरणी मंडळ अधिकारी अमृत हिले यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. टिप्परची किंमत सात लाख रुपये, तर वाळूची किंमत ६ हजार ५०० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. फरार चालकाचा शोध सुरू असून, पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# १५ वर्षांपासून रखडलेल्या नगर-कोपरगाव रस्त्यासाठी अर्धनग्न पायी आंदोलन

## सावळीविहीर ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ७० किमी प्रवास; संजय काळेंचा निर्धार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : गेल्या १५ ते २० वर्षांपासून रखडलेल्या नगर-कोपरगाव रस्त्याच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कोपरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी अनोखे आंदोलन सुरू केले आहे. सावळीविहीर फाटा ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय असे सुमारे ७० किलोमीटरचे अंतर ते अर्धनग्न अवस्थेत पायी चालून पूर्ण करणार आहेत.

> **आठ दिवसांचा पायी प्रवास**
>
> काळे यांच्या नियोजनानुसार बुधवारी राहाता ते बाभळेश्वर, २७ ऑगस्टला बाभळेश्वर ते कोल्हार, १ सप्टेंबरला कोल्हार ते राहुरी फॅक्टरी, २ सप्टेंबरला राहुरी फॅक्टरी ते राहुरी विद्यापीठ, ३ सप्टेंबरला राहुरी ते देहरे, ४ सप्टेंबरला देहरे ते एमआयडीसी आणि ५ सप्टेंबरला एमआयडीसी ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय असा प्रवास केला जाणार आहे.

मंगळवारी सावळीविहीर ते राहाता असा सुमारे १५ किलोमीटरचा प्रवास करून आंदोलनाची सुरुवात झाली. राहाता येथील छत्रपती शिवाजी चौकात पोहोचल्यानंतर शहरातील नागरिकांनी काळे यांचे स्वागत करून आंदोलनाला पाठिंबा दिला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राहाता शहराध्यक्ष विजय मोगले यांनी त्यांचा सत्कार करण्याचा प्रयत्न केला.

मात्र, मी कोणाचाही सत्कार स्वीकारणार नाही किंवा कुठेही भेट देणार नाही. मला पाठिंबा द्यायचा असेल तर माझ्याबरोबर दोन पावले चाला; हाच माझ्यासाठी सत्कार, असे काळे यांनी सांगितले.

काळे म्हणाले, नगर-कोपरगाव मार्गावर गेल्या १५ ते २० वर्षांत अनेक निष्पाप नागरिकांचा जीव गेला आहे. मंत्री बदलले, सरकारे बदलली, राजकीय पिढ्या बदलल्या; मात्र रस्त्याची अवस्था बदलली नाही. रुंदीकरणाच्या नावाखाली ब्रिटिशकालीन रस्त्यालगतची मोठमोठी वटवृक्ष तोडण्यात आली आणि रस्ता बोडखा करण्यात आला.

त्यानंतर दोन दशके उलटली, तरी रस्त्याची दुरवस्था कायम आहे. नागड्या जिल्ह्याचा प्रतिनिधी नागडाच चालणार; जनतेची लाज म्हणून कंबर झाकणार, अशी भूमिका स्पष्ट करीत काळे यांनी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन सुरू केल्याचे सांगितले. यावेळी मनसेचे शहराध्यक्ष विजय मोगले, रामनाथ सदाफळ यांच्यासह नागरिकांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.